रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १४२
www.ramprahar.com
◆ मंगळवार, ९ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अतितीव्र दिव्यांगांना मिळणार निर्वाह भत्ता/२
रसायनीतील एचआयएल कंपनीबाबत अफवा/५
रोहा-अष्टमी नव्या पुलावर तत्परतेने दुरूस्ती/७

## ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांचे निधन



**पुणे :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी, कामगारांचे नेते डॉ. बाबा आढाव यांचे सोमवारी (दि. ८) रात्री साडेआठच्या सुमारास निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. गेल्या काही महिन्यांपासून ते आजार होते. त्यातच त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना पुना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. अखेर उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. विज्ञान शाखेत बीएस्सी पदवी आणि आयुर्वेदात पदवीधर म्हणून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण केले. १९५३मध्ये घरातच दवाखाना सुरू करून त्यांनी गरीब रुग्णांना मोफत सेवा दिली. १९७०च्या दशकात बाबा आढाव पुणे महापालिकेचे नगरसेवक होते. तत्कालीन समाजवादी पक्षाचे सदस्य होते आणि रिक्षा पंचायतीने नेते म्हणूनही काम करत होते. 'एक गाव एक पाणवठा' नावाची मोहीम चालवली जात होती. आढाव त्याचे प्रणेते होते. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

### नागपूर हिवाळी अधिवेशन

# ७५,२८६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

■ शेतकऱ्यांसाठी १५,६४८ कोटी रुपये राखीव

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार (दि.८) पासून नागपुरात सुरू झाले. पहिल्याच दिवशी सरकारने ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यातील १५ हजार ६४८ कोटी रुपये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईसाठी राखीव आहेत.

लाडकी बहीण योजनेसाठी सहा हजार कोटींहून अधिक, तर मनरेगासाठी साडेतीन हजार कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी तीन हजार कोटी रुपये, एसटी महामंडळासाठी दोन हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. याशिवाय आयुष्मान भारतासाठी सव्वातीन हजार कोटी रुपये, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी दोन हजार २०० कोटी रुपयांची तरतूद सरकारने यात केली आहे.

विधानसभेत तालिका अध्यक्ष म्हणून चैनसुख संचेती, समीर कुणावार, किशोर पाटील, सरोज अहिरे, राहुल पाटील, उत्तम जानकर आणि रामदास मसराम यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात केली.



आचारसंहितेमुळे हे अधिवेशन अल्पकालीन असल्याचे स्पष्ट करून हा कालावधी पुढील अधिवेशनात भरून काढू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यानंतर विधानसभेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

विधान परिषदेत तालिका अध्यक्ष म्हणून अमित गोरखे यांची, तर अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे, सुनील शिंदे, कृपाल तुमाने यांची सदस्यपदी निवड झाल्याची घोषणा सभापती राम शिंदे यांनी केली. अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून विधान परिषदेचे कामकाजही तहकूब करण्यात आले.

### महायुती मजबूत : मुख्यमंत्री फडणवीस



नागपूर हिवाळी अधिवेशाच्या ठिकाणी पत्रकारांशी बोलताना शिवसेना उबाठा नेते आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदे गटाचे २२ आमदार भाजपच्या वाटेवर आहेत, असा दावा केला होता. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार पलटवार करत महायुती मजबूत होताना पहायला मिळेल, असे स्पष्ट केले.

'उद्या कोणीही म्हणू शकेल की आदित्य ठाकरेंचे २० आमदार आहेत तेही भाजपच्या गळाला लागले आहेत. कुणाच्या म्हणण्याने थोडेच काही होते. आम्हाला शिंदे सेनेचे आमदार आमच्याकडे घेऊन काय करायचे आहे? ते आमचेच आहेत. शिंदे सेना आमचा मित्रपक्ष आहे आणि ती खरी शिवसेना आहे. त्यामुळे आमच्या मित्रपक्षाचे आमदार घेऊन आम्हाला काय करायचेय. आम्ही अशा प्रकारचे राजकारण करत नाही. उलट शिवसेना मजबूत झाली पाहिजे यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी उभे आहोत. भविष्यात शिवसेना, भाजप आणि आमची महायुती अजून मजबूत होताना आपल्याला पहायला मिळेल', असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# पुण्याच्या 'बरड'ची बाजी

### ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी, सुनील बर्वे 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : हरेश साठे**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १२व्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका या राज्यातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या स्पर्धेत पुण्याच्या रंग पंढरी संस्थेच्या बरड एकांकिकाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत अटल करंडकावर आपले नाव कोरले. त्यांना एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.





या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

*नाट्यकला कधीही जुनी होत नाही आणि तिला निवृत्ती नाही. वाटचालीत रसिकांनी कायम प्रेम दिले. नाट्यकला ही सामूहिक कला आहे. त्यामुळे माझ्या यशात सर्वांचे योगदान आहे. अशा करंडकामधून नव्या पिढीला चांगले व्यासपीठ मिळाले असल्याने मराठी नाटकाचे भविष्य उज्वल आहे. माझा पुरस्काराने सन्मान केल्याबद्दल मी खूप आभारी आहे.*

***–सन्मानमूर्ती नीना कुलकर्णी**, ज्येष्ठ रंगकर्मी*

*संपूर्ण देशात मराठी रंगभूमी क्रियाशील आहे. तरुण पिढीची शक्ती रंगभूमीसाठी काम करत आहे. त्यामुळे रंगभूमी कायम ऊर्जितावस्थेत राहील. माझा सन्मान केल्याबद्दल आणि अशा उपक्रमाबद्दल ठाकूर कुटुंबीय आणि पनवेलकरांचे मनापासून आभार मानतो.*

***–सन्मानमूर्ती सुनील बर्वे**, लोकप्रिय कलाकार*

या वर्षी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने गौरव रंगभूमीचा पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुनील बर्वे यांना सन्मानित करण्यात आले. या दोन्ही मान्यवरांना प्रदान करण्यात आलेल्या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ आणि प्रत्येकी ५० हजार रुपये असे होते. पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचे पारितोषिक वितरण व सन्मान सोहळा रविवारी (दि. ७) दिमाखात झाला.

दानशूर व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक कार्याला नेहमीच पाठबळ राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा कलाकार आणि प्रेक्षकांच्या वतीने आयोजकांमार्फत विशेष सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**

## निवडक

### गोव्यातील नाईट क्लब आगप्रकरणी चौघांना अटक

**पणजी :** गोव्यातील अरपोरा येथील बिर्च बाय रोमिओ लेन या नाईट क्लबमध्ये लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. यात क्लबच्या जनरल मॅनेजरचा समावेश आहे. क्लबला २०१३मध्ये व्यापार परवाना दिल्याप्रकरणी अरपोरा-नाओआ ग्रामपंचायतीच्या सरपंचालाही ताब्यात घेण्यात आले आहे.

### ज्येष्ठ अभिनेते कल्याण चॅटर्जी यांचे निधन

**कोलकाता :** दिग्गज बंगाली अभिनेता कल्याण चॅटर्जी यांचे वयाच्या ८१व्या वर्षी निधन झाले. टायफॉईड व वृद्धापकाळाशी निगडित आजारांमुळे ते कोलकात्यातील एमआर बंगुर सुपर स्पेशॅलिटी रुग्णालयात उपचार घेत होते. पुणे चित्रपट इन्स्टिट्यूटमधून शिक्षण घेणाऱ्या कल्याण यांनी ४००हून अधिक चित्रपटात भूमिका करून बंगाली तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःची ठळक ओळख निर्माण केली. त्यांनी आपल्या करिअरमध्ये अधिकतर सहाय्यक भूमिका साकारल्या होत्या.



# चिंध्रण विभागात राजकीय परिवर्तन

■ 'उबाठा', शेकाप ग्रामपंचायत सदस्य भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिंध्रण विभागात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि शेतकरी कामगार पक्षाला धक्का बसला असून भाजपने या विभागात आपली घोडदौड अधिक वेगवान केली आहे. 'उबाठा' ग्रामपंचायत सदस्यांचे कुटुंबीय आणि शेकापचे माजी सदस्य यांनी भाजपमध्ये प्रवेश करून परिसरातील राजकीय समीकरणांमध्ये बदल घडवून आणला आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पाले खुर्द येथे हा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला. या वेळी 'उबाठा'चे ग्रामपंचायत सदस्य जीवन पाडेकर यांच्यासह वडील मधुकरशेठ पाडेकर, ग्रामपंचायत सदस्य कुसुम आत्माराम पाटील, त्यांचे पती आत्माराम पाटील यांनी तसेच शेकापचे नेते माजी ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग पवार यांच्यासह कार्यकर्त्यांनी रविवारी (दि. ७) विकासाचे 'कमळ' हाती घेतले.

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली झालेली रस्ते, पाणीपुरवठा, गावस्तरावरील मूलभूत व शैक्षणिक सुविधा आणि दीर्घकालीन विकास योजनांची अंमलबजावणी यामुळेच आम्ही भाजपमध्ये प्रवेशाचा निर्णय घेतल्याचे नव्या सदस्यांनी स्पष्ट केले. **(पान २ वर..)**

# जिनांपुढे काँग्रेसने गुडघे टेकले!

### 'वंदे मातरम्'वरील चर्चेदरम्यान पीएम मोदींचा घणाघात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

स्वातंत्र्यापूर्वी मोहम्मद अली जिना यांच्या नेतृत्वाखालील मुस्लिम लीगने १९३७मध्ये वंदे मातरम् गीताविरुद्ध मोहीम राबवली. अशा वेळी काँग्रेस आणि पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्यांना विरोध करण्याऐवजी वंदे मातरम्ची चौकशी सुरू केली. ते मुस्लिम लीगसमोर शरण गेले. आपल्या पुढच्या पिढ्यांना हे कोणी केले हे सांगणे आपले कर्तव्य आहे, अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत काँग्रेस आणि जवाहरलाल नेहरूंवर हल्लाबोल केला.



वंदे मातरम् राष्ट्रगीताला १५० वर्षे पूर्ण होत असताना संसदेमध्ये यावर चर्चा झाली. या वेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, मोहम्मद अली जिना यांनी जेव्हा वंदे मातरम्ला विरोध केला तेव्हा पंडित नेहरूंना त्यांची खुर्ची डळमळीत होताना दिसली. वंदे मातरम् या गीतातील काही शब्दांवर मुस्लिम लीगला आक्षेप होता. त्यानंतर काँग्रेसने वंदे मातरम्चे तुकडे केले. मुस्लिम लीगच्या दबावात काँग्रेसने हा निर्णय घेतला. लांगुलचालनाच्या राजकारणात काँग्रेस गुरफटली. त्यामुळे भारत फाळणीसारख्या दुर्दैवी निर्णयाला सामोरा गेला.

जिनांनी वंदे मातरम्ला विरोध केल्यानंतर पंडित नेहरूंनी सुभाषचंद्र बोस यांना एक पत्र लिहिले होते, यामध्ये त्यांनी म्हटले होते की, मी वंदे मातरम् गीताची पार्श्वभूमी वाचली आहे. ते मुस्लिमांच्या भावना भडकावू शकते. त्यानंतर काँग्रेसने जाहीर केले की, २६ ऑक्टोबरला कोलकाता येथील बैठकीत वंदे मातरम्च्या वापराचा आढावा घेतला जाईल. इतिहास साक्षी आहे की, काँग्रेस मुस्लिम लीगला शरण गेली, अशी टीकाही पंतप्रधान मोदींनी केली.

जेव्हा वंदे मातरम्ला ५० वर्षे पूर्ण झाली तेव्हा भारत ब्रिटिशांच्या ताब्यात होता. १०० वर्षे पूर्ण झाली तेव्हा भारत आणीबाणीच्या तावडीत होता. त्या वेळी देशभक्तांना तुरुंगात टाकण्यात आले होते. वंदे मातरम्ची १५० वर्षे ही आपल्या भूतकाळातील अभिमानाची आणि त्या महान भागाची पुनर्स्थापना करण्याची संधी आहे. या गीताने आपल्याला १९४७मध्ये स्वातंत्र्य मिळवण्याची प्रेरणा दिली, असे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले.

### उरण-नेरूळ रेल्वे फेऱ्यांमध्ये वाढ

# आमदार महेश बालदी यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे मानले आभार

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण-नेरूळ रेल्वे मार्गावरील फेऱ्यांमध्ये वाढ करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमदार महेश बालदी यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. उरण परिसरातील नागरिक, दैनंदिन प्रवासी, विद्यार्थी, महिला व व्यावसायिक यांच्या वाढत्या मागणीची दखल घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

आमदार महेश बालदी यांची मागणी व सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर रेल्वे मंत्रालयाने मंजूर केलेल्या वाढीव लोकल फेऱ्या नववर्षाच्या प्रारंभी सुरू होणार आहेत. निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर सकाळी ६.०५ वाजता सुटणारी पहिली गाडी तसेच रात्री उशिरा धावणाऱ्या अतिरिक्त लोकल्स यांचा औपचारिक शुभारंभ रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते होणार आहे. फेऱ्यांच्या



वाढीमुळे उरण, जासई, खारकोपर, गव्हाण आणि नेरूळ या परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उरण-नेरूळ मार्ग हा उरण उपनगरे, जेएनपीटी क्षेत्र, औद्योगिक पट्टा तसेच नवी मुंबई-मुंबईमध्ये कामधंद्यासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढीव फेऱ्यांमुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन सकाळ-संध्याकाळच्या गर्दीचा ताणही कमी होणार आहे. या भेटीत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रकल्पासंदर्भातील पुढील आवश्यक सुविधांच्या पुरवठ्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. रेल्वेसेवांचा विस्तार हा सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. उरण-नेरूळ रेल्वे फेऱ्यांमध्ये वाढ होणे हा उरण व आसपासच्या परिसरासाठी विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरेल तसेच दैनंदिन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित व सोयीस्कर बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. रेल्वेमंत्र्यांनी केलेल्या विशेष सहकार्याबद्दल आमदार महेश बालदी यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानून धन्यवाद दिले.

### एमपीएससी संयुक्त पूर्वपरीक्षा आता ४ जानेवारीला

**नागपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) २१ डिसेंबरला नियोजित महाराष्ट्र गट 'ब' अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. ही परीक्षा ४ आता जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीची एकत्रित मतमोजणी २१ डिसेंबरला होणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांसह महसूल विभागातील सर्व कर्मचारी मतमोजणीत व्यस्त असणार आहेत. म्हणूनच या तारखेला होणारी संयुक्त पूर्वपरीक्षा आयोगाने पुढे ढकलली असून ती आता ४ जानेवारीला होईल, असे एमपीएससी आयोगाने जाहीर केले आहे.

# नवी मुंबईसाठी आणखी एक मेट्रो मार्ग

### थेट मुंबईला करणार कनेक्ट

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईसाठी आणखी एक मेट्रो मार्ग बांधला जाणार आहे. राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला नवी मुंबई विमानतळाशी जोडण्यासाठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांच्या सहकार्याने मेट्रो लाईन आठ बांधण्याचा निर्णय घेतला आहे. ही लाईन नवी मुंबईच्या उपनगरांना थेट मेट्रो कनेक्टिव्हिटी प्रदान करेल. या लाईनवर ११ स्थानके प्रस्तावित आहेत.

महाराष्ट्र सरकारच्या मंजुरीनंतर मेट्रो लाईन ८साठी सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. त्यात प्रस्तावित मार्ग आणि स्थानकांची माहिती आहे. मानखुर्दहून वाशी खाडी पूल ओलांडल्यानंतर मेट्रो सायन-पनवेल महामार्गाशी जोडली जाईल. त्यानंतर हा मार्ग नेरूळ, सीवूड्स, उलवेसारख्या भागातून जाईल आणि थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहचेल. मेट्रो लाईन



८ आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) ३३७ किलोमीटरच्या मेट्रो नेटवर्कमध्ये सहभागी झाली आहे.

सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेल अंतर्गत हा प्रकल्प राबविला जाईल. नवी मुंबई विमानतळ २५ डिसेंबर रोजी सुरू होण्याची अपेक्षा असल्याने मेट्रो ८ या परिसरातील वाढत्या वाहतुकीचे व्यवस्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. यामुळे मुंबईहून नवी मुंबई विमानतळावर थेट प्रवेश सुलभ होईल आणि दोन्ही विमानतळांमधील प्रवास जलद होईल.

### असा असेल मेट्रो ८चा मार्ग

मानखुर्दहून नवी मुंबईत प्रवेश केल्यानंतर मेट्रो वाशी, सानपाडा आणि जुईनगरमधून जाईल. नेरूळमधील एलपी जंक्शनपासून मार्ग आत वळेल आणि डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठाजवळ एक प्रमुख स्थानक असेल. त्यानंतर हा मार्ग नेरुळ-सीवूड्समार्गे उलवेकडे वळेल. वंडर्स पार्क स्टेशन अपोलो हॉस्पिटल कॅम्पस आणि एनएमएमसी मुख्यालयाच्या मागे जाईल. सागर संगम आणि तरघर/मोहा स्टेशन वेगाने वाढणाऱ्या उलवे नोडला सेवा देतील. त्यानंतर मेट्रो विमानतळ कॅम्पसमध्ये प्रवेश करेल आणि एनएमआयए पश्चिम व शेवटी एनएमआयए टर्मिनल २वर थांबेल.

# अतितीव्र दिव्यांगांना मिळणार निर्वाह भत्ता

## रायगड जिल्हा परिषदेची नाविन्यपूर्ण योजना

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेने दिव्यांग कल्याण निधीमधून दिव्यांग व्यक्तींसाठी नाविण्यपूर्ण योजना म्हणून अतितीव्र दिव्यांग व्यक्तींना निर्वाह भत्ता देणे या योजनेचा अर्थसंकल्पामध्ये समावेश केला आहे. त्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव ३१ डिसेंबरपूर्वी गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयामध्ये सादर करावेत,असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.



योजनेसाठी लाभार्थी निवडी बाबतचे निकष, अटी व शर्ती आवश्यक कागदपत्रे काय असावीत हे निश्चित करण्यात आले आहे. योजनेसाठी विहित नमुन्यातील फॉर्म तयार करण्यात आलेले असून फॉर्म गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गाव पातळीवर सर्व ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे दिव्यांगत्वाचे प्रमाण ६० टक्के किंवा ६० टक्के पेक्षा जास्त असावे. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र धारक असावा. अर्जदाराकडे केंद्र शासनाच्या नवीन कायद्यानुसार दिव्यांगत्वाचे फक्त युडीआयडी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. जुने इतर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही. लाभार्थी, दिव्यांग व्यक्ती हा ग्रामीण भागातील व रायगड जिल्हयातील रहिवासी असणे गरजेचे आहे. तसेच तो नगर पालिका किंवा महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी नसावा असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**काय आहेत अटी शर्ती?**

लाभार्थ्याकडे ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असावे. लाभार्थ्यांचे वय १८ वर्ष व त्यापेक्षा जास्त असावे. उत्पन्नाचा दाखला अथवा दारिद्रय रेषेखालील दाखला. (उत्पन्न मर्यादा १ लाखाचे आत) कुटुंब दारिद्रय रेषेखालील असल्यास ग्रामसेवक किंवा गट विकास अधिकारी यांचा त्याबाबतचा संयुक्त दाखला, कुटुंब दारिद्रय रेषेखालील नसल्यास उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांच्याकडील आवश्यक आहे. लाभार्थी शासकीय, निमशासकीय कर्मचारी किंवा निवृत्ती वेतन (पेन्शन) धारक कर्मचारी नसावा.

## बोरघाटात दुचाकीला अपघात; तिघे जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**



जुन्या मुंबई पुणे महामार्गावर बोरघाटातील सायमाळ मेकॅनिक पॉईंट येथील मोटारसायकल अपघातात ३ जण जखमी झाले . जखमींना खाजगी वाहनातून खोपोली नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या अपघातात आई-वडील किरकोळ जखमी असून मुलीच्या पायाला गंभीर जखम असल्याने पुढील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात पाठविले.जखमींची नांव निशा थापा ११ , दानशिव थापा ४२ आणि सरिता थापा ४० रा. पिंपरी. पुणे अशी नावे आहेत ही घटना सोमवारी सायंकाळी ४.३० वा सुमारास घडली.

# उरण-भेंडखळ येथे कंटेनरच्या धडकेने युवकाचा जागीच मृत्यू

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील नवघरखोपटा रस्त्यावर सोमवारी दुपारी १:३० वाजता भीषण अपघात झाला. भेंडखळ गावातील ३८ वर्षीय अमोल काळूराम ठाकूर आपल्या मोटारसायकलवरून खोपटा गावाकडे जात असताना, बॉंमण लॉंडी यार्डजवळ असलेल्या कंटेनर ट्रेलरने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक देउन काही मीटर फरफटत नेले, ज्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.

### नागरिकांनी केला 'रास्ता रोको'

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली, कंटेनर ट्रेलरला ताब्यात घेतले आणि रस्त्यावर ठिय्या मांडून 'रास्ता रोको' आंदोलन सुरू केले. या मार्गावर सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांचा तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी घटनास्थळी पोहोचून नागरिकांशी संवाद साधला व सहकार्याचे आवाहन केले.



# कर्जत नगर परिषदेच्या मतदान यंत्राभोवती पोलिसांचा कडक बंदोबस्त

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान झाले असून मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार असल्याने मतदान यंत्र सुरक्षित ठेवण्याचे मोठे आव्हान पोलीस यंत्रणेसमोर आहे. मतदान यंत्र ठेवलेल्या स्ट्रॉंग रूम बाहेर पोलिसांचा २४ तास खडा पहारा ठेवण्यात आला असून २४ तास सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर या स्ट्रॉंग रूम बाहेर आणि आत ठेवण्यात आली आहे. अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तानाजी चव्हाण यांनी दिली.



कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ७२.३५ टक्के मतदान झाले असून २१, ६८० मतदारांनी मतदानाचा अधिकार बजावला आहे.या मतदारांकडून नोंद करण्यात आलेली यांची मतमोजणी तीन डिसेंबर रोजी होणार होती.मात्र न्यायालयाच्या निर्णयानंतर ही मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार आहे.कर्जत नगरपरिषद निवडणुकीसाठी झालेले मतदान यांची मतदान यंत्र ठेवण्यासाठी नगरपरिषद कार्यालयात स्ट्रॉंग रूम बनवण्यात आले आहे. त्या स्ट्रॉंग रूम बाहेर असलेला बंदोबस्त आणि २१ डिसेंबर रोजी होणारी मतमोजणी याबाबत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पालिका मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी माध्यमांना माहिती दिली.

त्यानुसार कर्जत नगरपरिषद निवडणुकीत मतदान झालेली मतदान यंत्र आणि मतदान युनिट हे ज्या स्ट्रॉंग रूम मध्ये ठेवण्यात आले आहे. त्या परिसरात २४ तास पोलिसांचा सशस्त्र पहारा ठेवला असून येथे उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यांना दिसेल असे स्क्रीन वर सीसीटीव्ही कॅमेरे यांचे चित्रीकरण दिसण्याची व्यवस्था केलेली आहे. उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधीना जाण्याची परवानगी असलेल्या जागेवरून स्ट्रॉंग रूम आणि त्या खोलीला लावण्यात आलेले कुलूप हे स्पष्ट दिसत असून त्या ठिकाणी कोणतेही शस्त्र घेऊन जाऊ नये. यासाठी मेटल डिटेक्टर बसवण्यात आले आहे. तसेच आणखी एक पोलिस चौकी पालिका कार्यालयाच्या तळमजल्यावर बसवण्यात आली आहे. तेथे एक अधिकारी आणि कर्मचारी असा बंदोबस्त पोलिसांकडून ठेवण्यात आला आहे हा बंदोबस्त २४ तास असतो.

मतमोजणीच्या दिवशी सकाळी साडे नऊ वाजता उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत मतदान यंत्र ठेवलेल्या स्ट्रॉंग रूमचे सील उघडण्यात येईल

पान १ वरुन

## पुण्याच्या 'बरड'ची बाजी

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महाअंतिम फेरीच्या पारितोषिक वितरण व सन्मान सोहळ्याला सन्माननीय उपस्थिती म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, पनवेल महापालिकेचे उपायुक्त गणेश शेट्य; तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे, दिगदर्शक व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक आयोजन कमिटीचे उपाध्यक्ष विलास कोठारी, निर्माता संजय पाटील, अटल करंडक ब्रॅंड ॲम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते सुव्रत जोशी, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद शेलार, प्रमोद अत्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, माजी महापौर कविता चौतमोल, युवा मोर्चाचे अध्यक्ष आनंद ढवळे, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा रूचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, मोनिका महानवर, वर्षा नाईक, अमित ओझे, प्रीतम म्हात्रे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष हिमेश बहिरा, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, स्मिता गांधी आदी उपस्थित होते.

महाअंतिम फेरीचे परीक्षण रंगभूमी, दूरदर्शन आणि चित्रपट क्षेत्रातील अत्यंत मान्यवर कलाकार म्हणून ओळखले जाणारे आणि सशक्त अभिनयशैली, दमदार आवाज आणि भावपूर्ण मुखअभिनय यामुळे प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलेले ज्येष्ठ अभिनेते गिरीश ओक तसेच मराठी टीव्ही आणि रंगभूमीवरील अभिनेत्री व दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, मराठी रंगभूमी, चित्रपट आणि मालिकांमध्ये काम करणारे अनुभवी अभिनेते सुनील तावडे यांनी केले. स्पर्धेचा ब्रॅंड ॲंबेसिडर आणि स्पर्धेचे स्वतःचे शीर्षक गीत असलेली ही महाराष्ट्रातील एकमेव एकांकिका स्पर्धा असून यंदाच्या स्पर्धेचे ब्रॅंड ॲंबेसिडर सुप्रसिद्ध मालिका व सिने अभिनेते सुव्रत जोशी होते.

स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेसाठी मुख्य प्रायोजक टीआयपीएल, सहप्रायोजक निल ग्रुप, तर मीडिया प्रायोजक सन मराठी आणि टीआरपी मराठी हे सोशल मीडिया प्रायोजक होते.

भव्य दिव्य सिने-नाट्य सोहळ्याला साजेसा असा अद्‌भूत आणि डोळ्यांचे पारणे फेडणारा सोहळा रंगला होता. दुपारी तीन वाजल्यापासून रसिक प्रेक्षकांच्या रांगा लागल्या होत्या. सोहळा हाऊसफुल झाल्याने अखेर प्रेक्षकांनी मिळेल त्या जागी बसून, तर काहींनी उभे राहून पण शिस्तीने या सोहळ्याचा आनंद लुटला. प्रसिद्ध मराठी अभिनेते व दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री यांनी त्यांच्या खास विनोदी आणि प्रभावी शैलीत बहारदार सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची रंगत वाढवली.

सोहळ्याच्या निमित्ताने हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट तसेच हास्यसम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे यांचा विनोदी मनोरंजनात्मक कार्यक्रम रंगतदार झाला. या सर्वांनी आपल्या अप्रतिम विनोदी कलेची उधळण करत उपस्थितांना खळखळून हसवले.

या वेळी सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे यांची अभिनेते पुष्कर श्रोत्री व सुव्रत जोशी यांनी परीक्षक मनोगत मुलाखत घेतली. महाअंतिम फेरीत तब्बल २५ एकांकिकाचे परीक्षण करताना आणि त्या बघताना खूप उत्सुकता होती. विषयांचे वैविध्य होते. प्रत्येक जण आपले पोटेन्शल घेऊन स्पर्धेत उतरला होता. एकांकिका सोपी नाही, कारण त्यात कला दिसते. हेवा वाटेल असे कलाकार यामध्ये बघायला मिळाले. त्यामुळे आम्हालाही यातून खूप शिकायला मिळाले. आयोजकांमध्ये नम्रता आणि सहकार्याची भावना स्पष्टपणे दिसून आली, असे मत गिरीश ओक यांनी व्यक्त केले. सुनील तावडे यांनी, अटल करंडकाविषयी खूप ऐकले होते. नवीन पिढीचे लेखन कलाविष्कार पहायला मिळाले. काही कलाकारांनी तर खूप चांगले काम केले असून तरुण पिढीमुळे रंगभूमीला पुढचा आधार मिळाला आहे, असे नमूद केले, तर प्रतिमा कुलकर्णी यांनी अशा स्पर्धेमुळे आणि संधीमुळे मराठी रंगभूमीला चांगले दिवस येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

या वेळी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून स्पर्धेची वाढती व्याप्ती, कलाकारांचा उत्स्फूर्त सहभाग आणि प्रेक्षकांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अटल करंडक स्पर्धेने एक तपपूर्ती गाठल्याचा उल्लेख करत त्यांनी पुढील अनेक वर्षेही या स्पर्धेवर सदैव आशीर्वाद राहावा, असे आवाहन केले. ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुनील बर्वे यांनी रंगभूमीसाठी केलेल्या अविरत सेवेला त्यांनी कृतज्ञतापूर्वक स्मरले. त्यांची समृद्ध कारकीर्द आणि निष्ठा ही भावी कलाकारांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांचा आशीर्वाद नवोदित कलावंतांना कायम लाभत राहावा, अशी मनोगतपूर्ण अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांनी प्रास्ताविकात अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या आजवरच्या वाटचालीचा विस्तृत आढावा मांडला. तीन दिवसांची ही स्पर्धा जरी अल्पकालीन असली, तरी तिच्या तयारीसाठी तब्बल सहा महिने मेहनत घ्यावी लागते, असे त्यांनी नमूद केले. उत्कृष्ट कलाकार या व्यासपीठातून घडावेत यासाठी ज्येष्ठ आणि दर्जेदार कलाकारांची परीक्षक म्हणून निवड केली जाते, अशी माहितीही त्यांनी दिली.

सन २००५मध्ये मल्हार करंडक ही स्पर्धा जिल्हास्तरावर होत होती. वाढता आवाका आणि गुणवत्ता लक्षात घेऊन तिला राज्यस्तरीय अटल करंडक या नावाने स्वरूप देण्यात आले आणि आज अटल करंडकाचे यंदाचे १२वे पर्व यशस्वीपणे पार पडले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठबळासह सर्वांच्या सहकार्यामुळे हे पर्व अधिक भव्य झाले, असे परेश ठाकूर यांनी सांगितले. मल्हार करंडकपासून आजवर जयवंत वाडकर यांचे मोलाचे योगदान कायम राहिले असल्याचेही त्यांनी विशेष उल्लेखाने नमूद केले. यंदा राज्यभरातील विविध केंद्रांवर झालेल्या प्राथमिक फेरीत १०२ एकांकिकांनी सहभाग घेतला होता. त्यातून निवडलेल्या २५ उत्कृष्ट एकांकिका अंतिम फेरीत स्पर्धा करीत आहेत. या स्पर्धेच्या यशात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, सीकेटी महाविद्यालय आणि टीम अटल करंडक यांची अखंड मेहनत असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांच्यासह शामनाथ पुंडे, अभिषेक पटवर्धन, अमोल खेर, गणेश जगताप, चिन्मय समेळ, वैभव बुवा, निखिल गोरे, कौस्तुभ सोमण, दिव्या शेठ, कोमल पाटील तसेच सीकेटी कॉलेज आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली. स्पर्धेला नाट्य संस्था, कलाकार आणि युवा आणि ज्येष्ठ रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

**२२ वर्षांपूर्वी माझीही सुरुवात अशाच एकांकिका स्पर्धेतून झाली होती. त्या काळात आम्ही एकांकिका सादर करत असताना एवढ्या मोठ्या स्वरूपाच्या स्पर्धा आयोजित केल्या जात नव्हत्या. काळाच्या प्रवाहात अटल करंडक स्पर्धेचा परीघ मोठ्या प्रमाणात वाढत गेला आणि आज ही स्पर्धा राज्यभर विस्तारली आहे. मराठी रसिकांचे नाट्यकलेवर आणि सिनेमावर असलेले प्रेम नेहमीच कलाकारांना ऊर्जा देत आले आहे. कलाकार आयुष्यभर शिकत राहतो आणि म्हणूनच नवोदित कलाकारांनीही निष्ठेने व सातत्याने प्रयत्न करत राहणे अत्यंत आवश्यक आहे. 'कलाकारखाना' या माझ्या संस्थेच्या माध्यमातून अनेक नवोदित कलाकारांना संधी मिळत आहे. याच धर्तीवर या स्पर्धेतूनही इच्छुक आणि गुणी नाट्यकलाकारांना व्यावसायिक नाटकांच्या क्षेत्रात पुढे जाण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.**
**-सुप्रसिद्ध अभिनेता सुव्रत जोशी,**
**अटल करंडक ब्रॅंड ॲम्बेसिडर**

**मराठी मन नेहमीच नाट्यकला आणि राजकारणात रममाण होत आले आहे. सामाजिक आणि शैक्षणिक सेवेच्या दृढ व्रतातून आम्ही श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था स्थापन केली. माझा सामाजिक वारसा अधिक विस्तारपूर्वक पुढे नेण्याचे कार्य आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर ही माझी दोन्ही सुपुत्र अत्यंत निष्ठेने पार पाडत आहेत. आज असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत अटल करंडक स्पर्धा उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाली. हजारो नवोदित कलाकारांना प्रेरणा, ऊर्जा आणि दिशा देण्याचे कार्य या ज्येष्ठ कलाकारांनी पार पाडले आहे, याबद्दल मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. या सर्वांचे सहकार्य, प्रेम आणि आशीर्वाद भविष्यातही असाच लाभत राहील, अशी श्रद्धा व्यक्त करतो. यापुढेही आपले ऋणानुबंध कायम राहतील.**
**-लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार**

**पारितोषिकाचे मानकरी**

**प्रथम क्रमांक** : 'बरड' (रंग पंढरी पुणे)-एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांक-'सपान' (डॉक्टर ग्रुप बीएमसी हॉस्पिटल मुंबई)-७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-'स्वातंत्र्य सौभाग्य' (मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड)-५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ बक्षिसे-'प्रतीक्षायान' (नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरी) आणि 'रेशनकार्ड' (अमर हिंद मंडळ दादर) १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, लक्षवेधी एकांकिका : 'हॅशटॅग इनोसंट'-अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर) ३० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, परीक्षक पसंती एकांकिका : 'किचकवध पुन्हा' (सीकेटी स्वायत्तम महाविद्यालय, पनवेल) २० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक** : प्रथम क्रमांक-निलेश गोपनारायण (हॅशटॅग इनोसंट-अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर) तीन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-सुनील डोंगरे (बरड-रंगपंढरी पुणे) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक साहिल, सुरत (सपान-डॉक्टर्स थिएटर ग्रुप व्हीएमसी हॉस्पिटल) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-अमित पाटील (स्वातंत्र्य सौभाग्य-मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट अभिनेता** : प्रथम क्रमांक-पात्राचे नाव रघुनाथ बर्वे (हॅशटॅग इनोसंट-अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर) तीन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-बाळू (सपान-डॉक्टर्स थिएटर ग्रुप व्हीएमसी हॉस्पिटल) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-तुका (बरड-रंगपंढरी पुणे) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-वामन (वामन अख्यान-मॉर्डन महाविद्यालय गणेशखिंड, पुणे) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट अभिनेत्री** : प्रथम क्रमांक-पात्राचे नाव ताईडी (बरड-रंगपंढरी पुणे) तीन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-इंदु (स्वातंत्र्य सौभाग्य-मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड), दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-गायत्री (प्रतीक्षायान-नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरी) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-आई (सपान-डॉक्टर्स थिएटर ग्रुप व्हीएमसी हॉस्पिटल) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट लेखक** : प्रथम क्रमांक-सुनील पोपट डोंगरे (बरड-रंगपंढरी पुणे) तीन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-संदीप दंडवते (हॅशटॅग इनोसंट-अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर), दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-सुरज कोकटे (सपान-डॉक्टर्स थिएटर ग्रुप व्हीएमसी हॉस्पिटल) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-राजीव मुळ्ये (किचकवध पुन्हा, सी.के.ठाकूर स्वायत्त महाविद्यालय, नवीन पनवेल) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट नेपथ्य** : प्रथम क्रमांक-अद्वैत सात्ते (स्वातंत्र्य सौभाग्य-मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड) तीन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-यज्ञेश पाडावे (अमिग्डाला, साठे महाविद्यालय विलेपार्ले) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-ऋषिकेश आंद्रे (पाकिस्तानचे यान, नाट्यंकुर मुंबई) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-विक्रांत (सांग रहियो, रेवन एंटरटेन्मेंट पुणे) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना** : प्रथम क्रमांक (सांग रहियो-रेवन एंटरटेनमेंट पुणे) तीन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-स्वातंत्र्य सौभाग्य-मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड, दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-निखील, साहिल (वामन अख्यान-मॉर्डन महाविद्यालय गणेशखिंड, पुणे) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-आकाश पांचाळ (पाकिस्तानचे यान, नाट्यंकुर मुंबई) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट संगीत** : प्रथम क्रमांक-रोहित महादेव (बरड-रंग पंढरी पुणे) तीन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-अभिजित आणि जय (वामन अख्यान-मॉर्डन महाविद्यालय गणेशखिंड, पुणे) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-दिपेश आणि अथर्व (प्रतीक्षायान-नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरी) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-चिन्मय आणि सुभोंद (मढ निघाले अनुदानाला, कलांश थिएटर) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**उत्कृष्ट वेशभूषा (कै. किशोर जोशी यांच्या स्मरणार्थ)** : गायत्री व नीरजा (प्रतीक्षायान-नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरी) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**अतुल परचुरे सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार** : 'सपान'-पात्राचे नाव मामा (डॉक्टर ग्रुप बीएमसी हॉस्पिटल मुंबई) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**उत्कृष्ट बालकलाकार** : सुभि-'सपान'-पात्राचे नाव सुमी (डॉक्टर ग्रुप बीएमसी हॉस्पिटल मुंबई) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

## चिंध्रण विभागात राजकीय परिवर्तन

या वेळी प्रवेशकर्त्यांचे स्वागत करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भाजपमध्ये येणारे प्रत्येक कार्यकर्ते आमच्यासाठी बळ देणारे ठरतात. चिंध्रण विभागाच्या विकासासाठी अनेक प्रकल्प सुरू आहेत. आगामी काळात आणखी सुविधा, रोजगाराच्या संधी आणि पायाभूत कामांवर लक्ष केंद्रित करून हा भाग विकसित करणार आहोत.

कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, एकनाथ देशेकर, कृष्णा पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी नगरसेवक गणेश कडू, रवींद्र भगत, प्रकाश खैरे, सरस्वती काथारा, माजी सरपंच कमला देशेकर, वासुदेव पाटील, राम पाटील, महेश पाटील, अशोक पाटील, नकुल जोशी, विशाल खानावकर, अरविंद गोंधळी, कैलास मढवी, बाळू काटे, नवनाथ पाटील, नितेश पाटील, अंकुश ढोबरे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## निवडक

### हरवलेली महिला सापडली



**पनवेल :** खांदेश्वर पोलिसांना एक हरवलेली महिला मिळून आली असून तिच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत. ही महिला खान्देश्वर पोलीस स्टेशन हद्दीत मीळुन आलेली असून तिचा पत्ता तिच्या लक्षात नाही व तीचे नाव आरती जाधव (वय ३६) माहीम येथून आलेली आहे. एवढेच सांगत आहे. जर कोणी यांच्या परिचयाचे असतील तर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे (९८५०६४१६२९) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बेवारस कार, रिक्षाला आग

**पनवेल :** करंजाडे सेक्टर ३ येथे सोमवारी सकाळी ४ वर्षांपासून बेवारस पडलेल्या स्विफ्ट डिझायर आणि रिक्षाला आग लागली होती, परंतु आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांच्या सावधानतेमुळे लगेचच अग्निशामक दलाला माहिती देऊन आग विझविण्यात आली. प्रत्यक्षदर्शी साहेबराव दाते यांनी त्यांच्या घरातून अचानक लागलेल्या आगीची माहिती प्रथमेश पुंडे यांना दिली आणि अग्निशामक दलाच्या मदतीने आग विझविण्यात आली. अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी येऊन सदर आगेवर नियंत्रण मिळवले. गाडी मालकाचा शोध पोलीस करीत असून ही आग कशामुळे लागली असावी याचा शोध पोलीस करीत आहेत.



# पनवेल महापालिकेचे महिला सक्षमीकरणाला प्राधान्य

## चारही प्रभागातील २० हजार महिलांना देणार दोन दिवसीय जागृती प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी, व्यवसायिक व सामाजिक कौशल्य वाढविण्यासाठी पनवेल महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महिलांना विविध लघुउद्योग आणि कौशल्यविकास विषयक प्रशिक्षणाबाबत मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागातील सुमारे २० हजार महिलांना दोन दिवसीय जागृती प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

महिलांना स्वावलंबी, सबळ बनविणे तसेच त्यांचा व्यावसायिक आणि सामाजिक सक्षमीकरण साधण्यासाठी पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने दोन दिवसीय प्रशिक्षण आणि जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा उद्देश महिलांना आरोग्य, रोजगार, व्यवसाय, कायदे, तंत्रज्ञान आणि सामाजिक हक्कांविषयी माहिती देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत विविध विषयांवर आधारित मार्गदर्शन करण्यात येणार आहे.



१. आरोग्यविषयक जनजागृती : महिलांच्या सुदृढ आरोग्यासाठी मासिक पाळी स्वच्छता, मानसिक आरोग्य, कॅन्सरविषयक जनजागृती तसेच आधुनिक आरोग्य साधनांचा वापर याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे.

२. योग, ध्यानधारणा आणि प्राणायाम : योगाचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम, ध्यानाचे फायदे तसेच प्राणायामाचे व्यावहारिक प्रात्यक्षिक महिलांना दिले जाणार आहे.

३. असंघटित महिलांसाठी उद्योजकता व रोजगार मार्गदर्शन : नवी मुंबई विमानतळ, एमआयडीसी, जेएनपीटी, पर्यटन, हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील रोजगार संधी, ऑनलाईन व्यवसाय, डिजिटल बँकिंग, गुंतवणूक पर्याय, तसेच घरातून सुरू करता येणारे व्यवसाय या विषयांवर प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

४. वैयक्तिक व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण : स्व-ओळख, संवाद कौशल्य, निर्णय क्षमता, वेळ व्यवस्थापन, आत्मविश्वास वाढविणे, इव्हेंट मॅनेजमेंट, योग्यता विकास अशा विषयांचा समावेश यात करण्यात आला आहे.

५. कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर प्रशिक्षण : कार्बन फुटप्रिंट कमी करणे, ओल्या-सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण, घरगुती कंपोस्ट तयार करणे आणि पुनर्वापराचे महत्त्व याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

६. कायदे विषयक जागृती व शासकीय योजना माहिती : महिलांसाठीचे कायदे, हुंडाबंदी, स्त्री-भ्रूणहत्या प्रतिबंध, 'पनवेल कनेक्ट अॅटप'चा वापर, शासकीय योजना आणि वेबसाईटवरून अर्ज प्रक्रिया अशा विषयांबाबत माहिती दिली जाणार आहे.

## पनवेलमध्ये २३ कुष्ठरुग्ण आढळले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यामध्ये नुकतीच कुष्ठरोग शोध मोहीम अभियान राबविण्यात आले. पनवेल तालुक्यामध्ये ग्रामीण भागातून ७२ हजार ९७४ घरांना भेटी देऊन त्यामधील तीन लाख ७५ हजार ६६० लोकांची तपासणी करण्यात आली. यासाठी एकूण २६० पथके व ५१ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली होती.

या मोहिमेदरम्यान १४ दिवसांमध्ये दोन हजार ९५२ संशयित रुग्णांची तपासणी केली. त्यापैकी एकूण २३ रुग्णांना कुष्ठरोगाची लागण झाल्याची आढळून आले. या रुग्णांवर उपचार सुरू करण्यात आले. जानेवारी २०२५ पासून डिसेंबर महिन्यात ८६ कुष्ठ रुग्णांवरती उपचार चालू आहेत. ही मोहीम तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा सागर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये संशयित कुष्ठरुग्ण तपासणीचे काम प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सायली मानकर, डॉ. अस्मिता बोंबटकर, डॉ. प्रभाकर पाटील, डॉ. आकाश वावेकर, डॉ. प्रणव उरणकर व तालुका पर्यवेक्षक राजेंद्र वानखडे, शरद बडे व डॉ. संदिप तोडकर यांनी केले.

## फेसबुक मैत्रीतून एकाची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

फेसबुकद्वारे एका अनोळखी महिलेसोबत मैत्री करणे तळोजा येथील एका ३७ वर्षीय पर्यावरणविषयक सल्लागाराला चांगलेच महागात पडले. या सल्लागाराने ज्या महिलेसोबत फेसबुकद्वारे मैत्री केली, त्या महिलेने या सल्लागाराला विश्वासात घेऊन त्याला फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवण्यास सांगून त्याच्याकडून तब्बल ५६ लाख २७ हजार रुपये उकळल्याचे उघडकीस आले आहे.

सायबर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात महिलेसह या प्रकरणात सहभागी इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये आरोही मिश्रा नावाच्या महिलेने फेसबुकवरून फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. विविध बँक खात्यांवर पैसे पाठवण्यास सांगितले. सुरुवातीला वेबसाईटवर बनावट नफा दाखवून त्याचा विश्वास जिंकला. त्यानंतर एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये समावेश करून रमेश शर्माच्याद्वारे ट्रेडिंग सुरू ठेवण्यास सांगितले. विविध खात्यांवर तब्बल ५६ लाख २७ हजार रुपये भरल्यानंतर वेबसाईटवर त्याच्या नावावर एक कोटी १७ लाखांचा नफा दाखवला. या सल्लागाराला संशय आल्यानंतर त्याने सायबर पोलिसांत तक्रार दाखल केली.



**पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, शुभ पाटील उपस्थित होते.**

## भाजप युवा नेते केदार भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी केदार भगत हे नेहमीच पुढाकार घेत असतात. शहरवासीयांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असणारे व्यक्तिमत्व म्हणजे केदार भगत. प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः हे ब्रीदवाक्य आचरणात आणून ते कार्य करतात, असे गौरवद्वार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केदार भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनावेळी काढले. तसेच, या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून जनतेची अधिक सेवा करावी, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.



भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी शहरातील प्रभूआळी येथे नागरीकांच्या समस्या सोडवण्यसाठी भाजपचे जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत रविवारी झाले.

या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठनेते जे.एम.म्हात्रे, जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जयंत पगडे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, शहर उपाध्यक्ष प्रितम म्हात्रे, उमेश इनामदार, प्रविण मोरबाळे, युवामोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, रोहीत जगताप, देवांशू प्रभाळे, तेजस जाधव, हिमेश बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. सर्वांनी भगत यांना शुभेच्छा दिल्या.



**उरण : पीएनजी ज्वेलर्सतर्फे उरण येथे भरविण्यात आलेल्या सोने व हिऱ्यांच्या भव्य दागिन्यांच्या परंपरा प्रदर्शन या आलिशान शो-रूमचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप नेत्या सीमा घरत, उद्योजक राज ठाकूर, प्राप्ती ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.**

**पनवेल : चांभार्ली ग्रुप ग्रामपंचायतीच्या राष्ट्रवादीच्या माजी सरपंच वृषाली म्हात्रे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे खालापूर तालुका उपाध्यक्ष कैलास म्हात्रे यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यानंतर त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पनवेल येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कृष्णा पारंगे, खालापूर तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती कांचन पारंगे, चांभार्लीचे सरपंच प्रतिक पाटील, ग्रामपंचायत सदस्या सदस्य प्रियंका पाटील, वनिता पारंगे, भूषण पारिंगे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



## खांदा कॉलनीत महिलांसाठी खेळ पैठणीचा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी परिसरातील महिलांसाठी रविवारी खेळ पैठणीचा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पक्षाचे नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून साकारलेला हा सोहळा बेलेजा बँक्वेट हॉलमध्ये अत्यंत दिमाखात पार पडला.

या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमाला सदिच्छा भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला. आपल्या भाषणात आमदार ठाकूर यांनी महिला सबलीकरणावर भर देत सांगितले की, केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकार महिलांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सामर्थ्यवान बनवण्यासाठी मोठ्या ताकदीने काम करत असल्याचे सांगून कोणत्याही समस्या असल्यास भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सदैव नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत, अशी ग्वाही दिली.





या सोहळ्याचे आकर्षण ठरली ती ममहाराष्ट्राची हास्यजत्राफ फेम अभिनेत्री शिवाली परब. शिवालीच्या उपस्थितीने महिला वर्गात मोठा उत्साह दिसून आला. तिने केवळ महिलांशी संवादच साधला नाही, तर चक्क संगीताच्या तालावर महिलांसोबत डान्स करत या सोहळ्याचा मनमुराद आनंद लुटला. खेळ पैठणीच्या या कार्यक्रमात पैठणी जिंकण्यासाठी महिलांमध्ये चुरस पाहायला मिळाली. विविध खेळांचे सादरीकरण आणि लकी ड्रॉच्या माध्यमातून विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्याला भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका कुसुम पाटील, चंद्रकला शेळके, माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, सदानंद पाटील, गोपीनाथ मुंडे, मोतीराम कोळी, संजय कांबळे, आशा मुंडे, प्रज्योती म्हात्रे, नितीन विचारे, अंकुश खरमाटे, रामनाथ पाटील, सचिन गायकवाड, शांताराम महाडीक, भूषण गायकवाड, संदेश भोपी आदी उपस्थित होते.

## बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा परिषदेत सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डी. वाय. पाटील लॉ कॉलेजतर्फे आंतरराष्ट्रीय मध्यस्थीकरण व वादपीठ परिषद २०२५ आयोजित करण्यात आली. या परिषदेत खांदा कॉलनी येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ. सानवि देशमुख यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली उल्लेखनीय सहभाग नोंदविला.

या परिषदेदरम्यान मध्यस्थीकरणाचे आधुनिक स्वरूप, वाद निराकरणाच्या तंत्रज्ञानाधारित पद्धती, न्यायव्यवस्थेतील बदल आणि जागतिक न्यायनीती यावर सखोल चर्चा झाली. विविध मान्यवर, तज्ज्ञ व कायदे संशोधकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना ज्ञान व अनुभवांची समृद्धी मिळाली.

या कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांना भारताचे माजी मुख्य न्यायमूर्ती आदरणीय गवई यांच्याशी संवाद साधण्याची प्राप्त झालेली संधी. संवादादरम्यान विद्यार्थ्यांनी मध्यस्थ कौशल्य विकास, न्यायव्यवस्थेतील व्यावहारिकता, वकील म्हणून व्यावसायिक शिस्त, करिअर संधी आणि जागतिक शांतता प्रक्रियेत कायद्याचा उपयोग याविषयी प्रश्न उपस्थित केले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध कार्यशाळा, पॅनेल चर्चा आणि प्रत्यक्ष संवाद सत्रांमध्ये सहभाग नोंदविला.




## सीकेटी शाळेमध्ये अवतरले फिरते वस्तुसंग्रहालय!



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई तर्फे, सिंधू-सरस्वती सभ्यता (हडप्पा सभ्यता) शोधाचे शतक निमित्ताने भारत विकास परिषदेच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेलमधील सीकेटी इंग्रजी विद्यालयात पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी फिरते वस्तुसंग्रहालय पाहण्याची अनोखी संधी उपलब्ध करून देण्यात आली होती.

या फिरत्या वस्तुसंग्रहालयात हडप्पकालीन अनेक अवशेषांचे तेथील दळणवळण, बांधकाम, संस्कृती, बाजार, साधने, शस्त्रे, भांडी, धातू, यांच्या चित्रे व प्रतिकृती ठेवल्या होत्या तसेच विद्यार्थ्यांना माहितीसाठी त्यांच्या सोबतच माहितीपत्रकेदेखील लावलेली होती. विद्यार्थ्यांना अभ्यासात असणाऱ्या मोहेंजोदडो संस्कृतीची प्रत्यक्ष माहिती मिळवली व विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण वातावरणात या संधीचा लाभ घेतला तसेच आपल्या शंकांचे निरसनदेखील करून घेतले.

भारत विकास परिषदेच्या सदस्यांनी सुरुवातीला विद्यार्थ्यांना हडप्पा सभ्यता याविषयी अतिशय उपयुक्त माहितीदेखील सांगितली. या वेळी सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक संतोष चव्हाण आणि सर्व शिक्षक उपस्थित होते.

## संपादकीय

# नियमांचे पालन हवेच

‘इंडिगो’ने आपली जबाबदारी नीट पार न पाडल्यामुळेच अलीकडच्या काळात अभूतपूर्व गोंधळ घडला. येत्या दोन दिवसांत परिस्थिती पूर्ववत होईल असे आता त्या कंपनीकडून सांगितले जाते आहे. परंतु प्रवाशांना झालेल्या पराकोटीच्या त्रासाची जबाबदारी निश्चित करावीच लागेल. त्यामुळे इंडिगो कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना केंद्र सरकारने नेमलेल्या संसदीय समितीच्या चौकशीला सामोरे जावे लागेल.

**इंडिगो एअरलाइन्स ही कंपनी आजवर विमानांची वारंवारता, कनेक्टिव्हिटी आणि वक्तशीरपणा यासाठी नावाजली जात होती. देशातील हवाई वाहतुकीत इंडिगोचा जवळपास ७५ टक्के वाटा आहे. त्यांनी जर सरकारी धोरणाचे पालन केले असते तर अलीकडच्या दिवसांत या एअरलाइनमुळे जो अभूतपूर्व गोंधळ उडाला तसे काही घडलेच नसते. केंद्र सरकारने अलीकडेच एक नियमावली जारी केली. वैमानिकांच्या कामांच्या तासांच्या संबंधातले नवे नियम या नियमावली अन्वये जाहीर करण्यात आले. यामध्ये वैमानिक तसेच केबिन क्रू आदी कर्मचाऱ्यांचा थकवा कमी व्हावा म्हणून त्यांचे कामाचे तास नियंत्रित करण्यात आले. विमान कंपन्यांना यासंदर्भातील कृती अहवाल सरकारला पाठवणेही बंधनकारक करण्यात आले. ही अवघी नियमावली अत्यंत महत्त्वाच्या अशा बाबींसंदर्भात व म्हणूनच अत्यावश्यक अशी आहे. अधिक सुरक्षित हवाईसेवा देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर रूढ असलेल्या सुरक्षा नियमांनुसारच या नियमावलीची आखणी करण्यात आली आहे. तिच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असा कर्मचारीवर्ग एअरइंडियाने उभा केला असे समजते. परंतु इंडिगोकडे मात्र तो नाही. कर्मचाऱ्यांच्या अभावातूनच इंडिगोची उड्डाणे रद्द होणे सुरू झाले. खर्चात कपात करण्याच्या धोरणातून इंडिगोकडून उपलब्ध कर्मचारीवर्गाकडूनच जास्त काम करून घेतले जात होते असे सांगितले जाते. त्यामुळेच सरकारची नवी नियमावली लागू होताच इंडिगोची अवघी यंत्रणाच कोलमडली. उड्डाणे रद्द झाल्यामुळे विमानतळांवर गर्दी जमा झाली व त्यातून निर्माण झालेल्या कमालीच्या गोंधळाच्या स्थितीत प्रवाशांचे पराकोटीचे हाल झाले. सरकारी नियमावलीचे पालन करणे विमानकंपन्यांसाठी बंधनकारकच होते व आहे. निव्वळ वर्चस्व निर्माण झाल्यामुळे इंडिगोला काही कुठल्याही नियमावलीतून सवलत मिळणार नाही. त्यांनी नियमावलीचे पालन केले असते तर इंडिगोची आज जगभरात जी नाचक्की झाली आहे, तसे काहीच घडले नसते. लोकांच्या इंडिगोवरील विश्वासाला मोठा धक्का बसला आहे. सरकारच्या संबंधित विभागाने नियमावलीचे पालन केले जाते आहे वा नाही हे काटेकोरपणे पहायलाच हवे. त्यासाठी विमानकंपन्यांना जे काही करावे लागणार आहे, ते केले जाते आहे किंवा नाही याकडेही लक्ष द्यायला हवे. इंडिगोची १५ डिसेंबरपर्यंतची जवळपास दोन हजारांहून अधिक उड्डाणे रद्द झाली आहेत. अर्थातच या साऱ्याचा मोठा फटका या कंपनीला बसणार आहे. अलीकडे उद्भवलेल्या या परिस्थितीतून सगळ्यांनीच धडा घेण्याची आवश्यकता आहे. अतिरिक्त मनुष्यबळाचे महत्त्व यातून विमानकंपन्यांच्या लक्षात आले असावे. संबंधित सरकारी विभागालाही अशी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याची तयारी ठेवावी लागेल. आता इंडिगोने रद्द केलेल्या आणि विलंब झालेल्या विमानांच्या तिकिटांचा परतावा देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. आतापर्यंत ६१० कोटी रुपयांचा परतावा देण्यात आला असून प्रवाशांच्या तीन हजारांहून अधिक बॅगा देण्यात आल्या आहेत. डीजीसीएने इंडिगोचे सीईओ पीटर एल्बर्स यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच इंडिगो कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना केंद्र सरकारने नेमलेल्या संसदीय समितीच्या चौकशीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.**

# मातीला ‘सजीव’ मानूया..!



जागतिक मृदा दिन दरवर्षी ५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो आणि तो केवळ औपचारिक दिन न राहता शेतीच्या मुळाशी असलेल्या मातीच्या आरोग्याचा गंभीर विचार करायला भाग पाडतो. अन्नसुरक्षा, पर्यावरणीय समतोल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या तिन्हींचे केंद्रस्थान म्हणून मातीचा विचार केला तर या दिवसाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. मातीचे आरोग्य टिकवणे म्हणजे भविष्यातील अन्नसुरक्षेची हमी होय. अनियंत्रित रासायनिक खत व कीडनाशकांचा वापर, खोल नांगरट, अवास्तव सिंचन आणि पिकपद्धतीतील एकांगीपणा यामुळे मातीतील सेंद्रिय अंश कमी होतो, सूक्ष्मजीव नष्ट होऊ लागतात आणि सुपीकता घसरते. अशा पार्श्वभूमीवर मातीला सजीव मानून तिची निगा राखण्याचा आणि शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचा जागतिक प्रयत्न म्हणजे ‘जागतिक मृदा दिन’ होय.

कोल्हापूर जिल्ह्यात यंदा जागतिक मृदा दिनानिमित्त चला माती समजून घेऊया शेती समृद्ध करुया हा उपक्रम विशेष पद्धतीने राबवला जात आहे. १ जुलै २०२५ रोजी कृषि दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यात पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियान अंतर्गत हेक्टरी १२५ टन शाश्वत ऊस उत्पादकता वाढ अभियानाचा शुभारंभ झाला आणि त्याच धाग्यावर मृदा दिनाच्या उपक्रमाला दिशा मिळाली. ऊस हा जिल्ह्याचा कणा असला तरी जास्तीच्या उत्पादनाच्या शर्यतीत मातीचा थकवा वाढत चालला आहे; पाण्याचा ताण, खतांचा अवाजवी वापर आणि रोग–किडींचा वाढता प्रादुर्भाव यामुळे शाश्वततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे हेक्टरी १२५ टन उत्पादन हे ध्येय ठेवतानाच शाश्वत हा शब्द अग्रस्थानी ठेवणे आणि त्यासाठी मातीच्या आरोग्याला केंद्रस्थानी मानणे ही या संपूर्ण मोहिमेची खरी ताकद आहे.

मृद दिनानिमित्त कोल्हापूर जिल्ह्यात किमान ३०० गावांमध्ये चला माती समजून घेऊया शेती समृद्ध करुया हा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. गावोगावी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन मातीची प्रत्यक्ष तपासणी, मार्गदर्शन आणि संवाद यावर भर दिला जाणार आहे. गावपातळीवर मेळावे, प्रात्यक्षिके आणि चर्चासत्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वतःच्या जमिनीचे आरोग्य जाणून घेण्याची संधी मिळेल आणि जमीन हेच आपले भांडवल ही जाणीव अधिक दृढ होईल.

केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने २०१५–१६ पासून राबवली जात असलेली मृद आरोग्य पत्रिका योजना या सर्व कामाच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. जमिनीचे योग्य पद्धतीने नमुने घेऊन प्रयोगशाळेत विश्लेषण केल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीची स्वतंत्र आरोग्य पत्रिका दिली जाते. यात मातीचा पीएच, क्षारता, सेंद्रिय कर्ब, नत्र, स्फुरद, पालाश तसेच सूक्ष्मअन्नद्रव्यांच्या कमतरतेची माहिती असते आणि त्यावर आधारित खतांच्या मात्रांचे वैज्ञानिक मार्गदर्शन केले जाते. कोल्हापूर जिल्ह्यात २०२५–२६ या वर्षातच २६ हजार शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिका वाटप करण्याचे नियोजन आहे. मात्र फक्त पत्रिका वाटप करून भूमिका पूर्ण होत नाही; शेतकऱ्यांना ती समजावून सांगणे, त्यातील आकडे वाचून प्रत्यक्ष शेतीच्या निर्णयांमध्ये रूपांतर करणे हे पुढचे महत्त्वाचे पाऊल आहे आणि याचसाठी या मृदा दिनी विशेष उपक्रम आखण्यात आला आहे.

या कार्यक्रमात सर्वात प्रथम शास्त्रोक्त पद्धतीने माती नमुने कसे घ्यावेत याचे प्रात्यक्षिक दाखविले जाणार आहे. अनेकदा चुकीच्या पद्धतीने घेतलेल्या नमुन्यांमुळे अहवाल दिशाभूल करणारे ठरतात आणि त्यावर आधारलेले खत व्यवस्थापनही गोंधळात टाकणारे होते. म्हणूनच योग्य खोली, झिगझॅग पद्धत, वेगवेगळ्या ठिकाणचे मिश्रित नमुने आणि स्वच्छ साधने याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन देण्यात येणार आहे. नमुने प्रयोगशाळेत गेल्यानंतर तयार होणाऱ्या मृद आरोग्य पत्रिकेतील प्रत्येक घटकाचा अर्थ, रंगकोड, शिफारसी यांचे सुलभ भाषेत स्पष्टीकरण दिले जाईल, जेणेकरून शेतकरी स्वतःही पुढे पत्रिका हातात घेऊन निर्णय घेऊ शकतील.

जमीन सुपीकता निर्देशांक आणि मृद आरोग्य पत्रिका आधारित खतांच्या संतुलित वापराबाबत एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाची भूमिका शेतकऱ्यांना समजावली जाईल. एका बाजूला रासायनिक खतांची शिफारस केलेली मोजकी मात्रा आणि दुसऱ्या बाजूला शेणखत, कंपोस्ट, हरभरा, सनई, ढैंचा यांसारख्या हिरवळीच्या खतांचा तसेच पीक अवशेषांच्या योग्य पुनर्वापराचा मिलाफ करून मातीला पोत, सेंद्रिय अंश आणि सूक्ष्मजीव संपन्नता परत देता येते. अशा एकात्मिक व्यवस्थापनामुळे उत्पादनात सातत्य येते, खर्चात बचत होते आणि जमिनीवर दीर्घकालीन भार न पडता पिके जोमाने वाढतात. सेंद्रिय खत वापराचे फायदे – पाण्याची वाढती धारणक्षमता, गाळ धूप कमी होणे, रोगप्रतिकारशक्ती वाढणे – हे सर्व मुद्दे उदाहरणांसह स्पष्ट केले जातील.

मृदा दिनाच्या उपक्रमाचा आणखी एक महत्वाचा पैलू म्हणजे गावांमधील शाळांमध्ये होणारी जनजागृती. विद्यार्थ्यांना माती परीक्षणाची साधी प्रक्रिया दाखवून, मातीतील विविध थर, त्यातील जिवसृष्टी, अन्नद्रव्यांचा प्रवास यांची ओळख करून दिली तर माती म्हणजे केवळ धूळ नसून एक जिवंत प्रणाली आहे ही समज लहानपणीच विकसित होते. पुढील पिढी पर्यावरणाबाबत अधिक संवेदनशील आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाची बनावी, हा या प्रयत्नामागचा उद्देश्य आहे. यासोबतच महाकृषि विस्तार एआय ॲप सारख्या तंत्रज्ञानाधारित साधनांचा वापर करून पिकानिहाय खत व्यवस्थापन, रोग निदान, शासकीय योजना, अनुदान इत्यादींचे मार्गदर्शन देण्याची तयारी करण्यात आली आहे. स्मार्टफोनच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हातात ताज्या व शास्त्रीय माहितीत पोहोचण्याची ताकद आहे आणि मृदा दिनाच्या निमित्ताने त्याचा जाणीवपूर्वक वापर होणार आहे.

या सर्व प्रक्रियेत गावातील प्रगतशील शेतकरी, आत्मा शेती सल्लागार समिती, नोंदणीकृत गट, शेतकरी मित्र आणि कृषि सखी यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. शेजारी शेतकरी एकमेकांचा अनुभव अधिक सहजतेने स्वीकारतात; त्यामुळे स्थानिक पातळीवर ज्ञानवाटपाचे जाळे तयार होते. कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी गावस्तरावर उपस्थित राहून विभागाच्या विविध योजना, अनुदाने व नव्या तंत्रज्ञानाबाबत माहिती देणार आहेत. परिणामी मृदा परीक्षण हा वेगळा, एकदाच होणारा कार्यक्रम न राहता संपूर्ण शेती व्यवस्थापनाचा अविभाज्य भाग बनू शकतो.

सर्व विभागातील शेतकरी, युवक, महिला तसेच अधिकारी व कर्मचारी यांनी या उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. केवळ शासनाकडून योजना राबविल्या जाऊन थांबणार नाहीत, तर शेतकरी आणि समाज यांच्या सक्रिय सहभागातून त्या जिवंत राहतील, ही जाणीव यातून दिसून येते. मातीचे आरोग्य टिकवणे म्हणजे भविष्यातील अन्नसुरक्षेची हमी, ग्रामीण अर्थव्यवस्थेची घडी आणि पर्यावरणाचा समतोल जपणे होय. जागतिक मृदा दिनाच्या निमित्ताने कोल्हापूर जिल्ह्यात सुरू होणारा हा अभ्यासपूर्ण आणि व्यापक उपक्रम, योग्य पद्धतीने राबविला गेला तर चला माती समजून घेऊया, शेती समृद्ध करुया हा संदेश खरोखरच प्रत्येक शेतजमिनीपर्यंत आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या मनापर्यंत पोहोचू शकतो.

**–सचिन अडसूळ,**
**जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**



## बदलते तंत्रज्ञान

# फोनमध्ये प्रोसेसर, रॅम किती महत्त्वाची?

आज बाजारात प्रत्येक बजेटसाठी, प्रत्येक गरजेसाठी आणि प्रत्येक वापरकर्त्यासाठी फोन उपलब्ध आहे. फक्त ब्रँड किंवा जाहिरात पाहून फोन खरेदी करणे शहाणपणाचे नाही. जर तुम्ही नवीन फोन घेणार असाल तर या ९ गोष्टी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. फोनमध्ये रॅम, प्रोसेसर किंवा डिस्प्ले निवडताना या गोष्टी लक्षात ठेवा...



**१. तुम्हाला किती रॅम हवी आहे?**

रॅम ही फोनची ॲक्टिव्ह मेमरी आहे, जी फोनला प्रत्येक काम वेगाने करण्यास मदत करते. हे रेस्टॉरंटमधील वेटरच्या उदाहरणावरून समजावून घ्या. रेस्टॉरंटमध्ये जेवढे जास्त वेटर असतील, तेवढी सेवा जलद असेल. त्याचप्रमाणे, रॅम जेवढी जास्त असेल, तेवढे फोन एकाच वेळी अधिक ॲप्स उघडून अडकणार नाही (लॅग होणार नाही). १५ हजार रुपयांपर्यंतच्या फोनमध्ये ६ ते ८ जीबी रॅम ठीक आहे.

**२. प्रोसेसर काय आहे... कसा निवडायचा?**

प्रोसेसर फोनची गती आणि क्षमता ठरवतो. सध्या स्नॅपड्रॅगन ८ एलिट जेन ५ आणि मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० हे टॉप लेव्हलचे मानले जातात. प्रोसेसरचा चिप आकार देखील महत्त्वाचा असतो. हा नॅनोमीटरमध्ये असतो. हा आकडा कमी असणे चांगले आहे. जसे की, ३एन एम  चिप ४एन एम पेक्षा प्रगत मानली जाते.

**३. एमोलेड–एलसीडी डिस्प्लेमधील फरक?**

एलसीडी हा एक पारंपरिक डिस्प्ले आहे. स्वस्त आणि बॅकलाइट वापरतो (एका प्रकारच्या ट्यूबलाइटसारखा प्रकाश).

एमोलेड हा प्रत्येक पिक्सेल स्वतः प्रकाशित करतो. याचा फायदा असा आहे की रंग मूळ दिसतात आणि कमी ऊर्जा वापरली जाते. चित्रपट–मालिका आणि डीप कॉन्ट्रास्टसाठी एमोलेड उत्तम आहे.

**४. रिफ्रेश रेट म्हणजे काय?**

रिफ्रेश–रेट म्हणजे स्क्रीन एका सेकंदात किती वेळा स्वतःला अपडेट करते. ६० कू म्हणजे ६० वेळा/सेकंद, ९०कू/१२०कू म्हणजे अधिक स्मूद निमेशन आणि स्क्रोलिंग. १४४कू/१६५कूम्हणजे गेमिंगसाठी आणखी स्मूद, पण फोनचा प्रोसेसर आणि गेम दोन्हीने सपोर्ट करणे आवश्यक आहे.

# समाजसुधारक अण्णासाहेब लट्ठे



## निमित्त

अण्णासाहेब बाबाजी लट्ठे हे कोल्हापूर संस्थानचे दिवाण व मुंबई इलाख्याचे पहिले अर्थमंत्री. त्यांचा जन्म बाबाजी नरहर लट्ठे व आदुबाई लट्ठे या दाम्पत्यापोटी ९ डिसेंबर १८७८ रोजी कुरुंदवाड येथे झाला.

अण्णासाहेबांचे चौथीपर्यंतचे शिक्षण कुरुंदवाड येथे झाले. १८९६मध्ये ते सांगली हायस्कूलमधून मॅट्रिक पास झाले. त्यानंतर राजाराम कॉलेज, कोल्हापूर व डेक्कन कॉलेज, पुणे येथून त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. मुंबई विद्यापीठातून इंग्रजी व अर्थशास्त्र या विषयातील एमए (१९०५) व पुण्याच्या लॉ कॉलेजमधून एलएलबी ही पदवी (१९१६) त्यांनी प्राप्त केली. अण्णासाहेब लट्ठे छत्रपती शाहूंच्या वसतिगृह चळवळीमुळे कोल्हापूरकडे आकर्षित झाले. १८९९मध्ये स्थापन झालेल्या दक्षिण भारत जैन सभेच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. क्विन व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग व दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या स्थापनेत त्यांनी छत्रपती शाहूंना मदत केली.

जैन समाजातील धार्मिक रूढी, परंपरा व वाईट चालीरीतींना विरोध करून महिला परिषद, स्त्रीशिक्षण विभाग आणि जैन श्राविकाश्रम यांच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. छत्रपती शाहूंची वसतिगृह चळवळ जैन वसतिगृहांच्या माध्यमांतून महाराष्ट्र व कर्नाटकात पसरवली. कोल्हापूर संस्थानात ॲक्टींग सिटी मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांनी काम केले. १९०८मध्ये दलितांच्या शिक्षणप्रसारासाठी ‘मिस क्लार्क होस्टेल’ची स्थापना झाली. त्या वेळी सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ डिस्प्रेड क्लास या दलितांसाठी काम करणाऱ्या संस्थेची स्थापना केली. शिक्षणाधिकारी असताना (१९११–१४) परंपरागत शिक्षक पद्धतीद्वारे शिक्षकांना वतने देऊन त्यांच्यावर बहुजन समाजाच्या शिक्षणाची जबाबदारी सोपवली. अशिक्षित पाटलांना गावच्या कारभारासाठी शहाणे करण्यासाठी पाटलांची शाळा हा अभिनव प्रयोग सुरू केला (१९११). वैदिक शाळा, शेतकी शाळा, वसतिगृह चळवळ, मुला–मुलींना शिष्यवृत्ती व फीमाफी, शाळातपासणी पद्धती या लट्ठेंनी सुरू केलेल्या योजना आहेत.

कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात व ठिकठिकाणी सत्यशोधकीय परिषदा भरविण्यात लट्ठेंचा पुढाकार होता. मद्रास प्रांतात जस्टीस पार्टीचे मुखपत्र म्हणून जस्टीस या वृत्तपत्राप्रमाणे मुंबई प्रांतात ब्राम्हणेतर समाजाचे डेक्कन रयत हे वृत्तपत्र ब्राम्हणेतरांची मते ब्रिटिश अधिकार्यांना कळावीत म्हणून ते इंग्रजीत चालवीत. हा ब्राम्हणेतर पत्रकारितेचा उगम होता. १९२०मध्ये हुबळी येथे त्यांनी राजकीय व सामाजिक परिषदेचे आयोजन केले. सत्यशोधक समाजाचे परिवर्तन झाल्यावर १९२०च्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीत ते बेळगाव जिल्हा ब्राम्हणेतर पक्षातर्फे मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून गेले. तेथे त्यांनी आपली मते आग्रहाने मांडली. केंद्रीय कायदेमंडळात त्यांनी ‘जोशी वतन बिल’ मांडले (१९२१), परंतु ते नामंजूर झाले. हेच बिल पुढे १९२६ साली रावसाहेब बोले यांनी मुंबई कायदेमंडळामध्ये मान्य करून घेतले. या समाजसुधारकाचे १६ मे १९५० रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात व्हिटॅमिन-डीची जाणवते कमतरता, काळजी घ्या!

हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता जाणवत असते. हाडांना मजबूत करण्यासाठी व्हिटॅमिन डीची खूप गरज असते. शरीरात याच्या कमतरतेने कॅल्शियमचे अब्जॉर्शन चांगल्या पद्धतीने होत नाही. त्यामुळे हाडे कमजोर होतात. हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता होण्याची जादा शक्यता असते. त्यामुळे आरोग्य धोक्यात येऊ शकते. तर चला पाहूयात शरीरात व्हिटॅमिन डीची कमतरता कशी भरुन काढायची ते पाहूयात..




व्हिटॅमिन डी हाडांसाठी तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी अतिशय गरजेचे आहे. लहान मुलांमध्ये व्हिटॅमिन डीच्या कमतरतेने त्यांची वाढ खुंटणे आणि हाडे कमजोर होण्यासारखे आजार होतात. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण जीवनावर नकारात्मक प्रभाव होतो. आर्थरायटिसच्या रुग्णांसाठीही व्हिटॅमिन डी गरजेचे असते. त्याच्या अभावी संधीवातात हाडे कमजोर होऊन सांधे दुखू लागतात. व्हिटॅमिन–डी ला ‘सनशाईन व्हिटॅमिन’ म्हटले जाते, कारण याचा सर्वाधित स्रोत सूर्यप्रकाश आहे. याच्या कमतरतेने मानसिक आरोग्यावरदेखील परिणाम होतात. डिप्रेशन येऊ शकते. हिवाळ्यात ऊन कमी असते. थंडीपासून वाचण्यासाठी आपण घरातून बाहेर पडत नाही तसेच सन प्रोटेक्शनच्या नादात निसर्गातून मोफत मिळणाऱ्या या व्हिटॅमिन डीला पारखे होतो.

रोज थोडावर सुर्यप्रकाशात फिरावे त्यामुळे शरीरासाठी व्हिटॅमिन डी मिळेल. सुर्याचा थेट प्रकाश शरीरावर पडल्याने व्हिटॅमिन डी तयार होते. त्यामुळे थोडावेळ ऊन्हात बसावे.

तुम्ही सकस आहार घ्यायला हवा, तसेच सी फूडमध्ये अधिक प्रमाणात व्हिटॅमिन असते. टूना (कुपा) , सालमन (रावस) आणि मॅकरल (बांगडा) या माशांमध्ये डी व्हिटॅमिनचा भरपूर असते. यांचा आपल्या आहारात समावेश केल्यास व्हिटॅमिन डीची कमतरता भरून काढता येते.

फोर्टिफाईड फूड म्हणजे त्यात पोषकतत्वांना स्वतंत्रपणे टाकून विकले जाते. काही फूड आयटम्समध्ये व्हिटॅमिन डी टाकून विक्री केली जाते, जसे दूध, दही, सीरल्स, ज्यूस आदी. आपल्या आहारात याचा वापर केल्यास व्हिटॅमिन डीची कमतरता दूर होईल.

मशरुम खाण्यानेदेखील व्हिटॅमिन डीची कमी भरुन काढता येते. त्यामुळे आपल्या आहारात मशरुमचा वापर अधिकाअधिक करावा. त्यामुळे आरोग्यात लागलीच सुधारणा होण्यास मदत होईल.

# रसायनीतील एचआयएल कंपनीबाबत अफवा; नागरिकांमध्ये संभ्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर व पनवेल तालुका परिसरातील केंद्र सरकारची उपक्रम एचआयएल कंपनीबाबत अलीकडे विविध माध्यमांतून चुकीची माहिती प्रसारित झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. प्रसारित अफवांमुळे कायमस्वरूपी कर्मचारी व कर्मचारी संघटना संतप्त झाल्या आहेत.

नवी दिल्ली येथून २४ नोव्हेंबर रोजी 'रसायन आणि खते' मंत्रालयाकडून कंपनीला एक नोट पाठविण्यात आली. त्यात काही प्रमाणात निर्गुंतवणूक करण्याची प्रक्रिया वेगात आणण्याचा उल्लेख आहे. कोची व भटिंडा येथील दोन युनिट आर्थिक तोट्यामुळे २०२२मध्ये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याची पुढील प्रक्रिया प्रलंबित असल्याने उपकरण विक्री व बंदीबाबतचे निर्देश पुन्हा देण्यात आले आहेत.




रसायनी युनिटला आर्थिक निधीची आवश्यकता असल्याने निर्गुंतवणुकीचा प्रस्ताव समोर ठेवला असला तरी याचा चुकीचा अर्थ अनेकांनी काढल्याचे युनियनचे म्हणणे आहे.

दरम्यान, हा निर्णय मागे घेण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे व सुनील तटकरे यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू आहे.

कंपनीची आर्थिक स्थिती २०२१ ते २०२३ नंतर स्थिर होत असून, UNIDO च्या सहकार्याने BTI प्लांट रसायनीत उभा राहत आहे. या प्लांटच्या अंतिम चाचणीसाठी UNIDO चे शिष्टमंडळ १० डिसेंबर रोजी येणार आहे. यामुळे कंपनीचा औद्योगिक दर्जा उंचावणार असून बी-बियाणे, कीटकनाशके, रसायने अशा अनेक नवीन प्रकल्पांची दारे खुली होणार आहेत. यामुळे स्थानिक रोजगार व संबंधित उद्योगधंद्यांना मोठा आधार मिळणार आहे, अशी माहिती युनियनकडून देण्यात आली.

> **कंपनीचे भवितव्य आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावे यासाठी रसायन आणि खते मंत्रालयाद्वारे प्राप्त झालेला निर्गुंतवणुकीचा निर्णय रद्द करण्यासाठी आम्ही सर्व युनियनच्या वतीने खासदार श्रीरंग बारणे आणि खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून प्रयत्नात आहोत. नुकताच दोन्हीही खासदारांना भेटून निवेदन दिले आहे**
>
> **-राहुल जाधव, सहसचिव**
> एच.आय.एल. रसायनी कामगार सेना

# माणगाव कचेरी रोडवर धुळीचे साम्राज्य; नागरिक हैराण

**माणगाव : बातमीदार**

माणगांव मधे सध्या धुळीच साम्राज्य झालं आहे. कचेरी रोड, कालवा रोड, डॉक्टर वैद्य नेत्र हॉस्पीटल ते प्रशासकीय भवन कार्यालय, साई मंदिरा पर्यंत संपूर्ण रस्त्यावर धूळीचे साम्राज्य आहे. त्यामुळे या परिसरातील हवेत सतत धुलीकण श्वासातुन फुफ्फुसात जाऊन सर्दी, खोकला, दमा होण्याची दाट शक्यता आहे.

माणगांव शहरातील नवीन पाणीपुरवठा योजनेंतर्गत सध्या पाईप लाईनचे काम सुरू असल्याने तसेच अनेक ठिकाणी झालेल्या खोदकामामुळे परिसरातील धुळीचे प्रमाण वाढले आहे. विशेष म्हणजे तहसिलदार प्रशासकीय भवन कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याला खड्डेच खड्डे असल्याने तेथील खड्डे बुजविण्याचे काम



आणि रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु केले गेले मात्र हे काम आठवडाभर सुरु असून तेथे डांबर कार्पेट अंथरण्याचे काम अर्धवट रखडल्याने येथील झालेल नुसतेच खडीकरण व क्रस्ट मिश्रीत धुलीकण येथील रस्त्यावरुन कोणतेही वाहन गेल्यावर हवेत उडुन चालणे मुश्किल होते.

तसेच हवेतील धुळ येथील नेत्र रुग्णालयात तसेच येथील घराघरात थराने जमा होऊन अस्वच्छतेत भर पडली आहे. तालुक्यातील व बाहेर गावाहून नेत्र चिकित्सेसाठी आलेले रुग्ण व येथील स्थानिक नागरिकांना श्वास गुदमरत असल्याचा अनुभव येत आहे. संबंधित प्रशासन व नगरपंचायतकडुन याची दखल घेत हे काम लवकरात लवकर पुर्ण करावे अशी नागरिकांची मागणी होत आहे. निवडणूकांच्या प्रचारात व्यस्थ पुढाऱ्यांना माणगांवमधील रस्त्यावरील धुरळा दिसत नाही का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून येत आहे.

# मोरया ग्रुपतर्फे फणसाड मार्गावरील दुर्तफा स्वच्छता



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील युवकांच्या मोरया ग्रुपने रोहा मुरुड मार्गावरील फणसाड वन्यजीव संरक्षक अभयारण्यातील सुपेगाव घाटातील रस्त्यावर दि .७ डिसेंबर रोजी दुतर्फा वाढलेली झाडे-झुडुपे तोडून व रस्त्यातील पालापाचोळा आदी कचरा साफ करून सदर रस्ता चकाचक केला.

रविवारी सकाळी या तरुणांनी येथील रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली व सदर रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या लहान मोठ्या वाहनांना अडचणींची ठरत असलेली रानमोडींची झुडुपे, वाळलेले गवत आदींची सफाई केली. या वर्षी अजूनपर्यंत सातत्याने बरसणाऱ्या पावसामुळे येथील झाडे झुडुपे कमालीची वाढल्याने या रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या वाहनांना तसेच वळणावर समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज येत नसल्याने वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत होती.

सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या मोरया ग्रुपने हा रस्ता स्वच्छ केल्यामुळे वाहन चालक व प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. या कामी मोरया गृप संयोजक संजय ठाकूर सह विक्रांत कुबल, संतोष मळेकर, कृणालेश गाणार, सुरेंद्र देऊळकर, विशाल ठाकूर, दिपेश कांबळे, स्वराज पाटील, तेजस चोरघे, स्मित देऊळकर आदींनी विशेष परिश्रम घेतले .

## शिवसेना माणगाव उपतालुका प्रमुख सुधीर पवारांचा राजीनामा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर येथील सुधीर दत्तूशेठ पवार यांनी शिवसेना उपतालुका प्रमुख पदाचा राजीनामा देत असल्याचे अधिकृत घोषणा माणगाव येथील अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय याठिकाणी सोमवार दि. ८ डिसेंबर रोजी सकाळी पत्रकार परिषदेत बोलताना केली.

यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना सुधीर पवार यांनी सांगितले कि,मी शिवसेना पक्षाचा उपतालुका प्रमुख असतानाही गेली काही महिन्यांपासून मला पक्षामार्फत होत असलेल्या विविध विकासकामांची भूमिपूजन व उदघाटने याकार्यक्रमांतून वेळोवेळी डावलले जात होते. मंत्री भरतशेठ गोगावले यांनीही माझ्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. निजामपूर विभागातील शिवसेना पक्षाची अंतर्गत असणारी गटबाजी याला कंटाळून मी पक्षाच्या उपतालुकाप्रमुख पदाचा राजीनामा देत आहे.

# महाडमधील महिलेसह दोन लहान मुलांचा शोध घेण्यात यश

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसी पोलीसांच्या कार्यकौशल्यामुळे हरवलेली महिला व तिची दोन मुले अखेर सुखरूप सापडली. पुणे येथे त्यांचा मागोवा लागताच पोलिसांनी तातडीने त्या ठिकाणी पोहोचून तिघांना सुरक्षित ताब्यात घेतले, व कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले.

दिनांक २४ नोव्हेंबर रोजी सकाळी महिला बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली होती. सदर प्रकरणाचा तपास सपोनि जिवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा मोहिते यांनी तर तांत्रिक तपास पोकॉ बल्लाळ यांनी अत्यंत बारकाईने केला. उपलब्ध माहिती, तांत्रिक साधनांचा वापर, कॉल लोकेशन, सिसीटीव्ही फूटेज तसेच विविध ठिकाणांवरील तपासणीच्या आधारे पथकाने पुणे शहरात शोधमोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान मिसिंग महिला श्रुती अमोल राऊत (वय २५ वर्षे) आणि तिची दोन लहान मुले आयुष व विर यांचा शोध यशस्वीरित्या लावण्यात पोलिसांना यश आले. पुणे येथे त्यांचा मागोवा लागताच



पोलिसांनी तातडीने त्या ठिकाणी पोहोचून तिघांना सुरक्षित ताब्यात घेतले.

दिनांक ०८ डिसेंबर २०२५ रोजी महाड एमआयडीसी पोलीस पथकाने श्रुती राऊत व तिची मुले यांना तिच्या नातेवाईक तसेच पती अमोल राऊत यांच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द केले.



**माणगाव : येथील नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी निवड झालेल्या नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष रिया रत्नाकर उभारे यांचे भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे व महिला मोर्चाच्या माणगाव तालुकाध्यक्ष रचना थोरे यांनी अभिनंदन केले.**



**चौक : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महानिर्वाण दिनी ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले यांच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. सरपंच प्रिया प्रफुल्ल विचारे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ यांनी या वेळी अभिवादन केले.**

## तळा येथे अपंग, माजी सैनिकांसाठी गाळे आरक्षित ठेवण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा नगरपंचायत अंतर्गत असणाऱ्या गाळ्यांमध्ये अपंग,माजी सैनिक इत्यादींसाठी त्यांची उपजीविका भागविण्यासाठी आरक्षित गाळे ठेवावेत, अशा मागणीला जोर चढतांना दिसत आहे.

तळा नगरपंचायत अंतर्गत नवीन गाळ्यांमध्ये वाढ करून ते नवीन गाळे बांधण्यात यावेत व त्यामधे अपंग, माजी सैनिकांसाठी आरक्षीत ठेऊन त्यांना दिलेली सुविधा ही त्यांनीच वापरावी आपली उपजीविका भागविण्यासाठी घेतलेल्या गाळ्यांमध्ये त्यांनी स्वतः व्यवसाय चालू ठेवावा. कोणीही दुसऱ्यास आरक्षीत असलेला गाळा अधिक भाडा घेउन भाड्यांनी देऊ नये. असाही सुर काहींकडून निघताना दिसत आहे.

तळा शहरात सुशोभिकरण झालेली तलावं व श्रीचंडिका मंदिर, एसटी स्टॅण्डच्या मागे अशा ठिकाणीही नवीन गाळे नगरपंचायतीला बांधता येतील त्यातून नगरपंचायतीचे उत्पन्न वाढण्यास व नगरपंचायतीला एक आर्थिक स्त्रोत निर्माण होण्यास मदत होईल.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त रातवडमध्ये अभिवादन कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून करण्यात आली.

इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय, शिक्षणाचे महत्व, संविधान निर्मिती आणि समानता या विषयांवर प्रभावी मांडणी करत प्रबोधनात्मक भाषणे दिली.शिक्षक भिवा पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बाबासाहेबांच्या विचारांचे आजच्या पिढीसाठीचे महत्व सांगितले.

कार्यक्रमात श्रुती मोरे हिने सादर केलेल्या नृत्याने सर्वांची मने जिंकली. तिच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला सांस्कृतिक स्पर्श मिळाला.महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधत विद्यालयात आयोजित केलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, समता आणि सामाजिक बांधिलकी यांची जाणीव अधिक दृढ झाली.

## नवोदय विद्यालयात १३ डिसेंबरला प्रवेश परीक्षा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जवाहर नवोदय विद्यालय, पीएमश्री स्कूल, निजामपूर येथील इयत्ता सहावीकरिता प्रवेश परीक्षा शनिवार, १३ डिसेंबर २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यातील परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी ३ हजार २२४ विद्यार्थी बसणार असून ८० जागांसाठी निवड प्रक्रिया होणार आहे, अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत राघमवार यांनी दिली.

परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांची नावे, रजिस्ट्रेशन क्रमांक तसेच ओळखपत्रे ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली आहेत. उमेदवारांनी https://navodaya.gov.in संकेतस्थळावरुन प्रवेश पत्र डाउनलोड करावेत.


### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

कार्यालय : आयुक्त मुख्यालय, २रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६.
दुरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

### जाहीर आवाहन

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार उघड्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर प्राण्यांना अन्न खाऊ घालण्यास प्रतिबंधीत केले आहे. सर्व नागरिकांना सुचित करण्यात येत आहे की पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत निश्चित केलेल्या फिडींग स्पॉट व्यतिरिक्त इतर ठिकाणी श्वानांना खाऊ घालण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. निश्चित फिडींग स्पॉर्ट व्यतिरिक्त इतर ठिकाणी उघड्यावर श्वानांना खाऊ घालताना आढळ्यास संबधितांवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ८/१२/२०२५

आदेशास्तव,
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.६६९/६९२/२०२५



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ६६/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. सांडपाण्याने बाधित गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या डीआय प्रकारच्या जलवितरण वाहिन्यांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे तसेच फ्लो मीटरसाठी एफआरपी केबिनसह सौर ऊर्जा पुरवठा व अनुषंगिक कामे करणे. | ₹ २५,२२,३२८.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... पोलादपूर येथील सावित्री धरणातील १.२० मीटर X १.२० मीटर आकाराच्या आपत्कालीन गेटची दुरुस्ती करणे, १.२० मीटर X १.२० मीटर आकाराच्या सर्व्हिस गेटचे परिचालनाकरीता मोटरायझेशन व इतर अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३९,५२,९७०.०० |
| ३ | पेण अलिबाग प्रदेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... पोयनाड येथील शुध्द उदंचन केंद्रातील १००० केव्हीए ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती व सर्व्हिसिंग करणे. | ₹ ३७,७९,०४७.०० |
| ४ | नागोठाणे औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....जलशुद्धिकरण केंद्रातील फिल्टरबेडवरील ऑपरेटिंग सिस्टमसाठी दोन वर्षांच्या कालावधीसाठी इंटर कंपॅटिबिलिटी पुरविणे. | ₹ २९,०१,८८८.०० |
| ५ | तळोजा औद्योगिक क्षेत्राची देखभाल व दुरूस्ती / वागळे बूस्टर पंपिंग स्टेशन / टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजना........ तळोजा सांडपाणी निःसारण योजना टप्पा १ व २, वागळे बूस्टर पंपिंग स्टेशन, ऐरोली सांडपाणी निःसारण आणि रबाळे सांडपाणी निःसारण येथील विविध ईओटी क्रेनची दुरुस्ती, सर्व्हिसिंग करून प्रमाणपत्र देणे. | ₹ ६,२६,०९८.०० |
| ६ | तळोजा औद्योगिक क्षेत्र... तळोजा पाणीपुरवठा योजनची देखभाल व दुरूस्ती.... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील मॅन्युअली पाण्याचे मीटर वाचन करण्यासाठी दोन वर्षे कालावधीकरीता सेवा पुरविणे. | ₹ ५,२७,४७२.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०९/१२/२०२५ ते दिनांक २३/१२/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १२/१२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १७/१२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. रमेश मारुती थोरात** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : विंधणे (५५३३२४)**
**(PU-ID : 29383143337), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २५३/३ | १ | ०.९५.३० पो.ख. ०.११.९० **एकुण १.०७.२०** | १०.१२ |
| पैकी श्री. रमेश मारुती थोरात यांचे नावे असलेले खालील क्षेत्र | | | |
| खाते क्र.१०२४४ | | ०.१८.१० पो.ख. ०.१९.९० **एकुण ०.३०.००** | २.४० |
| श्री. रमेश मारुती थोरात यांच्या मालकीचे असलेले एकुण क्षेत्र ०.३०.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/१२/२०२५

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

# एसटी आगारात चोरट्यांचा उच्छाद

## गर्दीमध्ये ज्येष्ठ नागरिकाचे दागिने चोरले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य परिवहन महामंडळाच्या पनवेल येथील बस आगारामध्ये पुन्हा एकदा प्रवाशांना लूटीचे प्रकरण घडल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रविवारी सकाळच्या गर्दीत अज्ञात चोरट्याने एका ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरून नेले. पनवेल बस आगारात अशा प्रकारच्या घटना वाढत असून बस आगार प्रशासनाने पोलिसांच्या सहाय्याने तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

रविवारी सकाळी सुमारे सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास डेरवली गावात राहणारे ६१ वर्षीय जेष्ठ नागरिक आपल्या नातेवाईकांना एसटी गाडीत बसविण्यासाठी पनवेल बस आगारात होते. बस उशीराने असल्याने बसमध्ये चढण्यासाठी प्रवाशांची गर्दी वाढली होती. नातेवाईकांनी बसण्यासाठी



बसमधील आसन मिळावे यासाठी संबंधित जेष्ठ नागरिक स्वता गर्दीत चढून त्यांनी बसचे आसन मिळवले. काही वेळाने नातेवाईक बसमध्ये चढल्यावर त्यांना स्वताच्या आसनावर बसवून ते बसमधून खाली उतरले.

नातेवाईक व बसपासून काही अंतरावर ते पोहचल्यानंतर त्यांना स्वतःच्या गळ्यातील सोनसाखळी न दिसल्याने त्यांना चोरी झाल्याचे समजले. पनवेल शहर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदविल्यावर सुमारे एक लाख ४० हजार रूपयांची सोनसाखळी व पॅण्डल चोरी केल्याची तक्रार संबंधित ज्येष्ठ नागरिकाने दिली. चोरीची जाणीव होताच त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक अभिजीत अभंग आणि तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक अनंत परागे यांनी घटनास्थळी भेट देऊन प्राथमिक माहिती गोळा केली.

बस आगारातील सीसीटिव्ही कॅमेरांमधूनसुद्धा तांत्रिक तपास पोलिसांनी सुरू केला. त्यानंतर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला. एसटी बसमधील वाढती गर्दी, प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष आणि बस आगारातील सततची हालचाल यामुळे चोरट्यांना संधी मिळत असल्याची सर्वसामान्य प्रवाशांमध्ये नाराजी आहे.

बसस्थानक प्रशासन व पोलिसांनी संयुक्तपणे गस्त वाढवून, सीसीटीव्ही प्रणाली सुधारून आणि गर्दी नियंत्रण उपाययोजना केल्याशिवाय अशा घटना रोखणे अवघड असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. पनवेल बस आगारातील प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेऊन अनेक प्रवाशांना लुटीचा सामना करावा लागला आहे.

बस आगारात पूर्वीप्रमाणे पोलीस चौकीत बसण्याची सोय नसल्याने येथे २४ तास पोलीस उपलब्ध नसतात, मात्र पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांनी साध्या वेशातील पोलीस या परिसरात गस्त ठेवल्याचे पोलीस विभाग आणि राज्य परिवहन मंडळाचे बस आगार व्यवस्थापनाकडून सांगण्यात येते.

२४ तास येथे पोलीस उपलब्ध आणि बसमध्ये चढताना रांगाचे व्यवस्थापन केल्यास चोरीच्या घटना टळू शकतील. याबाबत बस आगार व्यवस्थापनाला विचारले असता त्यांनी यापूर्वी अनेकदा रांगेत प्रवाशांना बसमध्ये चढता यावे यासाठी उपाययोजना केल्या, मात्र गर्दीच्यावेळी प्रवासी ऐकत नसल्याने या उपाययोजना फोल ठरल्या, मात्र पोलिसांनी यामध्ये पुढाकार घेऊन गर्दीवेळी वर्दीतील पोलीस याठिकाणी उभे केल्यास प्रवाशांना सुरक्षित बसमध्ये चढता येईल.

# बेलापूरच्या कौटुंबिक न्यायालयात मध्यस्थी जनजागृती कार्यक्रम

## समोपचाराने वाद मिटवण्याचा संदेश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कौटुंबिक विवादांवर समोपचाराने आणि प्रभावीपणे तोडगा काढण्यासाठी कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथे ६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता मध्यस्थी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुभाष काफरे, न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई यांनी भूषवले तसेच व्यासपीठावर त्यांच्यासोबत नवी मुंबई कोर्ट बार संघटनेचे उपाध्यक्ष संदीप रामकर आणि सचिव विकास म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शीतल गायकवाड यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेमध्ये प्रशिक्षित मध्यस्थ ॲड. मोहित मोकल यांनी मध्यस्थी प्रक्रियेचे महत्त्व आणि फायदे स्पष्ट केले. या वेळी न्यायाधीश सुभाष काफरे यांच्या संकल्पनेतून 'मध्यस्थी' या विषयावर लघु नाटिका सादर करण्यात आली. या लघु नाटिके मध्ये भूमिका सादर करणारे कलाकारांमध्ये ॲड. वंदना दळवी, ॲड.शोभा पाटील, ॲड.संध्या सावंत, ॲड.कृष्णा पवार, ॲड.प्रसाद मढवी, ॲड.विशाखा जाधव, ॲड. किरण भोसले, तसेच कौटुंबिक न्यायालयाचे वरिष्ठ लिपिक कांचन किरवे आणि सहायक राज निकम



यांचा समावेश होता.

या भूमिकेमधून नवरा-बायकोमधील भांडण आणि त्या भांडणांचा कुटुंबावर आणि मुलांवर होणारा नकारात्मक परिणाम स्पष्ट करण्यात आला. त्यानंतर हे दाम्पत्य न्यायालयात गेल्यावर मध्यस्थीच्या माध्यमातून त्यांचे वाद कसे मिटवले जातात, हे दाखवून शेवटी ते जोडपे एकत्र येऊन सुखी संसार होतो, हा सकारात्मक शेवट प्रभावीपणे दाखवण्यात आला.

या महत्त्वपूर्ण भूमिकेत सहभागी झालेल्या सर्व कलाकारांना नवी मुंबई कोर्ट बार संघटना आणि कौटुंबिक न्यायालय, बेलापूर यांच्या वतीने प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले. आभार गणेश हिरवे यांनी मानले. या कार्यक्रमामुळे कौटुंबिक विवादांचे न्यायालयाबाहेर सामंजस्याने निराकरण करण्यासाठी 'मध्यस्थी' हा एक प्रभावी मार्ग कसा आहे, याबद्दल उपस्थितांमध्ये जनजागृती झाली.

# शॉर्टसर्किटमुळे कांबे येथे घराला आग



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शॉर्टसर्किटमुळे घराला आग लागल्याची घटना रसायनीतील कांबे गावात घडली. आगीत म्हात्रे कुटुंबाच्या संसाराची राखरांगोळी झाली आहे. सुदैवाने घरातील सर्व जण समयसूचकता दाखवत बाहेर पडल्याने जीवितहानी टळली आहे.

कांबे गावात विठ्ठल म्हात्रे आणि वसंत म्हात्रे यांचं एकमजली कौलारू घर आहे. दुपारच्या सुमारास घराच्या बाजूस कौलातून मोठ्या प्रमाणात धूर दिसल्यानंतर शेजाऱ्याने आरडा ओरड केला. घरात असलेले म्हात्रे कुटुंबातील सर्वजण तातडीने लाकडी वासे आणि फायबर पीओपीमुळे आग झपाट्याने वाढली. तातडीने पाताळगंगा अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.

आग झपाट्याने वाढत घराच्या खालील बाजूसही पसरल्याने घरातील सर्व सामान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. अग्निशमन दलाने आग विझवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करत आग आटोक्यात आणली, परंतु आगीमध्ये म्हात्रे कुटुंबाचं प्रचंड नुकसान झाले.

# जिल्हा परिषद शाळांमध्ये वक्तृत्वाचा जल्लोष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत रायगड जिल्हा परिषद शाळांचा आंतरशालेय पारितोषिक वितरण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या स्पर्धेत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा - कोपरा, मुरबी, आणि खारघर या तीन शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. विविध फेऱ्यांमधून उत्तम कामगिरी करून एकूण २४ विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावले आणि त्यांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व, माझे स्वप्न, पर्यावरण



## कोपरा, मुरबी, खारघर येथे टॉप २४ विद्यार्थ्यांचा गौरव

संवर्धन, प्लास्टिकमुक्त भारत, डिजिटल युगातील विद्यार्थी, जर मी नेता असतो अशा विविध विषयांवर प्रभावी, स्पष्ट आणि आत्मविश्वासपूर्ण मांडणी केली. पारितोषिक वितरण सोहळ्यात विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, कोपरा, मोरबी आणि खारघर येथील रा. जि. प. शाळांमधील विद्यार्थ्यांची कामगिरी खरोखर प्रेरणादायी आहे. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील मुलांना स्वतःला सिद्ध करण्यासाठी आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळते.

मुख्याध्यापिका अनिता शेळके यांनी प्रयत्नांचे कौतुक करताना नमूद केले. आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांची भाषणकला, नेतृत्वगुण आणि विचारशक्ती विकसित होते. कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांनी पुढाकार घेतल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

या उपक्रमामुळे रायगड जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून, त्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळाली आहे.

या कार्यक्रमाला भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, खारघर महासचिव दीपक शिंदे, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, उपाध्यक्ष अजित अडसुळे, दत्ता ठाकूर, माजी उत्तर रायगड सचिव ब्रिजेश पटेल, खारघर माजी उपाध्यक्ष किरण पाटील, ज्येष्ठ नेते सुरेश ठाकूर, प्रभाग ५ अध्यक्ष अजय माळी, महिला मोर्चा उपाध्यक्ष अश्विनी भुवड, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश अभिमन्यू पाटील, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, सचिव आदित्य हाटगे, योगेश पाटील, मयूर घरत, यश पवार, अनिकेत पाटील, बंटी ढाकसे आदी उपस्थित होते.

# रसायनीतील वेदांत शिंदे द व्हॅली रन स्पर्धेत प्रथम



**मोहोपाडा : प्रतिनिधीह**

लोणावळा येथील आंबिवली या ठिकाणी दि फेडरेशन ऑफ मोटार स्पोर्ट क्लब ऑफ इंडीया यांनी आयोजित केलेली Castrol पुरस्कृत स्पर्धा THE VALLEY RUN २०२५ या एका चाकावर जास्तीत जास्त जोरात ५५० सीसीची मोटरसायकल (FASTEREST WHEELIE INDIAL UPTO 55OCCC) (F3) चालविण्याचे स्पर्धेमध्ये रसायनीतील रिस येथील वेदांत शिंदे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

वेदांतने देशभरातील स्पर्धकात प्रथम येवून रायगड जिल्हयाचे नाव उंचावले आहे. या स्पर्धेमध्ये भारतातील अनेक स्पर्धाकांनी भाग घेतला होता. वेदांत याने एका चाकावर कमी वेळात ४०० मीटर अंतर १४ सेकंदमध्ये पार करून स्पर्धा जिंकली आहे. वेदांत हा पोलिस उपनिरीक्षक सुधीर शिंदे व प्रिया स्कुल मोहोपाडा येथील शिक्षिका निशा शिंदे यांचा चिरंजीव आहे. त्याच्या यशाबद्दल वेदांतवर सर्व थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याचे स्थानिक राजकीय, पत्रकार, सामाजीक क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच मित्रांनी अभिनंदन केले.

# महात्मा फुले महाविद्यालयाच्या ममता चव्हाणला कबड्डीत 'सुवर्ण'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेली ममता विजयकुमार चव्हाण हिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे आयोजित २७व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात मुंबई विद्यापीठ महिला कबड्डी संघात सहभागी होऊन सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे.

महाराष्ट्रातील नामांकित विद्यापीठांना मागे टाकत मुंबई विद्यापीठाच्या महिला कबड्डी संघाने हे देदिप्यमान यश संपादन केले आहे. या संघात मागील दोन वर्षांपासून आपल्या अमीट खिलाडूवृत्तीचा ठसा उमटवून ममता चव्हाण हिने मुंबई विद्यापीठाला सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक मिळवून देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

ममता चव्हाण हिच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, ममता चव्हाण ही विद्यार्थिनी म्हणजे खऱ्या अर्थाने आमच्या महाविद्यालयाची सुवर्णकन्या आहे, कारण जिमखाना विभागाची प्रतिनिधी म्हणून मुंबई विद्यापीठाच्या कबड्डी संघात तिने आपले भक्कम स्थान निर्माण करून सुवर्णपदकाची परंपरा कायम ठेवली आहे. आपल्या कामगिरीत तिने असेच सातत्य ठेवले तर देशाच्या संघातही ती आपले स्थान निश्चित करू शकेल, याची मला खात्री आहे. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी ममता चव्हाण व तिच्या कुटुंबियांचे विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी तिला शुभेच्छा दिल्या.

ममताच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, जे. एम. म्हात्रे, महेंद्रशेठ घरत, अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर व संजय कडू आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, उपप्राचार्य प्रो. डॉ. लक्ष्मण गवळी, डॉ. आर. पी. म्हात्रे, जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, रजिस्ट्रार श्री. अनंता जाधव, प्रा. सुनील अवचिते, प्रो. डॉ. सोनू लांडे, प्रा. रामदास जमनुके, डॉ. यशवंत उलवेकर, प्रा. प्रवीण गायकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान विभागाच्या इंचार्ज प्रा. सुनिता काटकर, कला विभागाच्या इंचार्ज प्रा. ललिता अवचिते व वाणिज्य विभागाचे इंचार्ज प्रा. सतीश ढगे, डॉ. नितीन ससाणे, डॉ. लीना मेश्राम, डॉ. रुपश्री कडू, प्रा. अतुल पोखरकर, प्रा. संतोष गोरवे, प्रा. ज्ञानेश्वर बगनर, प्रा. नयन कोळी, प्रा. रोहन जितेकर, प्रा. मयूर पाटील, श्रीमती वैशाली शेलार व प्रशिक्षक श्री. अक्षय जितेकर तसेच जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी त्याचे विशेष अभिनंदन केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे बॉक्सिंग स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नवीन पनवेल (स्वायत्त) यांच्या वतीने गुरुवारी (दि.४) चेअरमन माजी खासदार लोकनेते श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सव वर्षनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा २०२५-२६ मध्ये रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



या स्पर्धेत आर्यन भाटोसे (७४ कि.ग्रा.)- सुवर्ण पदक - वेदांत म्हात्रे (१०० कि.ग्रा.)- सुवर्ण पदक ,आरिफ शेख (५४ कि.ग्रा.)- सुवर्ण पदक ,भावना सिंग (५१ कि.ग्रा.)- रौप्य पदक, नेहा राठोड (४६ कि.ग्रा.)- रौप्य पदक - सिद्धेश खडतर (९० कि.ग्रा.)- रौप्य पदक , झैद बुरोंडकर (७४ कि.ग्रा.)- कांस्य पदक - केदार (६५ कि.ग्रा.)- कांस्य पदक या विद्यार्थ्यांनी पदकांची कमाई केली.

विजेत्यांना संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडदे, चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के पाटील यांनी अभिनदंन करून शुभेच्छा दिल्या. यासोबतच रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सर्व विद्यार्थ्यांचेअभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या तसेच फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत यांनी या स्पर्धसाठी त्यांना मार्गदर्शन केले.

# वाशीत शुक्रवारी ऑपरेशन सिंदूर पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सावरकर विचार मंच, नवी मुंबई तर्फे ब्रिगेडिअर हेमंत महाजन लिखित ऑपरेशन सिंदूर (बदलता भारत -संयमातून सडेतोड उत्तराकडे) या पुस्तकाचे प्रकाशन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते येत्या १२ डिसेंबर रोजी वाशीत होणार आहे. कार्यक्रम सायंकाळी ७ वाजता वाशी येथील गुजरात भवन सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

लेखकाने, या पुस्तकात भारताने पाकिस्ताविरुद्ध स्वीकारलेली मल्टी डोमेन स्ट्रॅटेजी सविस्तरपणे उलगडलेली आहे. सायबर हल्ले, माहिती प्रवाहाचे नियंत्रण आणि सॅटेलाइट इंटेलिजन्स या सर्व क्षेत्रात भारताने साधलेले तांत्रिक प्रभुत्व पुस्तकात सविस्तरपणे मांडले आहे. सिंधु पाणी कराराचा फेरविचार, आत्मनिर्भर भारताचे शस्त्रसामर्थ्य, भविष्यातील धोके इत्यादी गोष्टींचे सखोल विश्लेषण या पुस्तकात लेखकाने केले आहे.

या कार्यक्रमात पुस्तकाचे लेखक ब्रिगेडिअर हेमंत महाजन यांचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनसह ऑपरेशन सिंदूर विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असला तरी नोंदणीसाठी ९९३०४१०००१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन सावरकर विचार मंच, नवी मुंबईचे अध्यक्ष संतोष कानडे यांनी केले आहे.

# उलवे नोड येथील भूमिपुत्र सभागृहात गीत गायनाचा कार्यक्रम

**उरण : प्रतिनिधी**

उरण उत्कर्ष समितीचे संस्थापक-अध्यक्ष गोपाळ पाटील निर्मित संगीत के सप्तरंग' हा हिंदी गाण्यांचा ऑकेस्ट्रा रविवारी ७ डिसेंबर रोजी उलवे नोड येथील भूमिपुत्र सभागृहात सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र घरत हे या संगीत मैफलीचे मुख्य प्रायोजक होते. तर आई इन्फ्रा, टीआयपीएल या सहप्रायोजकांबरोबर अन्य मान्यवरांचेही या कार्यक्रमाला सहकार्य लाभले.



या संगीत मैफलीची सुरुवात धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहून झाली. गोपाळ पाटील, आकांक्षा भोईर, उमंग गोस्वामी, दक्षता स्वरूप, संगीता डे, महेंद्र कारले, राजा भोसले, राहील शेख, रवि नाईक यांच्या समुधर आवाजाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले.

या वेळी कॉ. भूषण पाटील, साई मंदिराचे अध्यक्ष रविशेठ पाटील, नरसू पाटील, ॲड. डी. के. पाटील, नरेश रहाळकर, सुधाकर पाटील, विकास नाईक, सदानंद गायकवाड, कृष्णा बा. पाटील, भाऊशेठ पाटील, शरद ठाकूर, मिलिंद पाडगावकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आनंद घेतला.

# रोहा-अष्टमी नव्या पुलावर दुरुस्ती

## ‘रामप्रहर’च्या बातमीचा परिणाम; सा.बां.विभागाकडून कार्यवाही

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा-अष्टमीदरम्यान नव्याने बांधण्यात आलेल्या पुलावरून जाताना येणारा ‘धडामधूम’ लोखंडी आवाज वाहनांना बसणारा तीव्र धक्का चालक घाबरून ब्रेक दाबत असलेली परिस्थिती अखेर या साऱ्याला ब्रेक लागला आहे. दैनिक रामप्रहरने ही त्रुटी ठळकपणे उघडकीस आणताच सार्वजनिक बांधकाम विभाग तातडीने हलला आणि उपाययोजनेची मोठी मोहीम राबविली.



पुलाच्या मधोमध बसवलेला लोखंडी जॉइंट पूर्णपणे वर उठल्याने वाहनांच्या धक्क्याने जोरदार आवाज निर्माण होत होता.विशेषतः दुचाकी, रिक्षा आणि लहान चारचाकी वाहनांना अचानक बसणारा धक्का इतका तीव्र होता की अनेक चालक घाबरून थेट ब्रेक मारण्याच्या स्थितीत जात होते.

रात्रीच्या वेळी हा आवाज आणखी भेसूर होत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे सावट पसरले होते. यात भर म्हणून जॉइंटच्या आजूबाजूचे काँक्रीट एका बाजूने पूर्ण उखडलेले आढळले. त्यामुळे लोखंडी पट्टी आणखी बाहेर निघून अपघाताची शक्यता वाढली होती.

‘रामप्रहर’मध्ये बातमी प्रसिद्ध होताच संबंधित विभाग सतर्क झाला. पुलावरची दुरुस्ती तातडीने करण्यासाठी एक दिवस संपूर्ण पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. या काळात विभागाने वेगात काम पूर्ण केले. खडी-सिमेंट टाकून खड्डे भरले, उखडलेल्या काँक्रीटची दुरुस्ती केली, लोखंडी जॉइंटची उंची तातडीने कमी करून समतलता केली. अभियंता पथकाने पाहणी करून कायमस्वरूपी दुरुस्तीची योजना तयार केली, कामानंतर पुलावरील आवाजात घट झाल्याने वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### तातडीच्या कार्यवाहीने नागरिकांकडून समाधान

स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तातडीच्या कार्यवाहीचे स्वागत केले असून, हे सर्व दैनिक रामप्रहरच्या प्रभावी बातमीमुळे शक्य झाले, असे नागरिकांनी स्पष्टपणे सांगितले. तथापि, हे केवळ तात्पुरते समाधान असल्याने पुलाची अंतिम, दर्जेदार आणि तांत्रिक दुरुस्ती तातडीने करण्यात यावी, अशी मागणीही नागरिक, प्रवासी आणि वाहतूकदारांकडून केली जात आहे.

# डॉ. बाबासाहेबांनी दिलेला मंत्र आजच्या पिढीसाठी दिशादर्शक -प्रा. उमेश इनामदार



**पाली : प्रतिनिधी**

शिक्षण, संघटन आणि संघर्ष हा महामानव डॉ.बाबासाहेबांनी दिलेला मंत्र आजच्या तरुण पिढीसाठी दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन प्राध्यापक उमेश इनामदार यांनी केले.

शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय, पाली येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात झाला.


या कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रा. उमेश इनामदार (वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख) यांनी भूषविले. तर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. सोहोनी (इतिहास विभाग प्रमुख) उपस्थित होते.

या वेळी व्याख्यानात प्रा. डॉ. सोहोनी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा, सामाजिक चळवळीतील योगदानाचा तसेच भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतील त्यांच्या अतुलनीय कार्याचा सखोल आढावा घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्रा. उमेश इनामदार यांनी बाबासाहेबांच्या विचारांची आजच्या सामाजिक परिस्थितीत गरज अधोरेखित करत, समता, न्याय, बंधुता आणि आत्मसन्मान ही मूल्ये समाजमनात रुजवणे हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात चैतन्या काळभोर हिने आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त करत, त्यांच्या विचारांनीच आपले जीवन घडत असल्याची भावना व्यक्त केली. तिच्या भावनिक व अभ्यासपूर्ण भाषणाला उपस्थितांकडून विशेष दाद देण्यात आली. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. घरटकरांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय -खासदार तटकरे




**मुरूड : प्रतिनिधी**

डॉ . सनाउल्लाह घरटकर यांनी आखाती देशात उद्यमशिलतेच्या बळावर मोठे साम्राज्य निर्माण केले असले तरी ते मुरुडच्या मातीला ते विसरलेले नाहीत. शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात काम करत असतांना संजीवनी आरोग्य संस्थेला त्यांच्या दातृत्वामुळे खऱ्या अर्थाने संजीवनी संस्थेला स्थैर्य प्राप्त करून दिले असुन पदमश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या सारख्या सेवा व्रतीचे संस्थेला मार्गदर्शन लाभल्याने मुरुड सारख्या ठिकाणी डायलिसीस सेंटर द्वारे गरीब गरजुंची सेवा करीत असल्याने सर्व सामान्यांना उपचार घेणे शक्य झाले आहे, असे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले.

डॉ. घरटकर फाउंडेशन व संजीवनी आरोग्य सेवा संस्था मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दशक पूर्ती सोहळ्यानिमित्त सामाजिक सुधारणा आणि आमचे उत्तरदायित्व या मराठी व इंग्रजी पुस्तकांच्या अनावरण सोहळ्यावेळी अध्यक्ष पदावरून तटकरे मागदर्शन करताना बोलत होते.

आपल्या भाषणात खासदार तटकरे यांनी संजीवनी संस्थेच्या लागणाऱ्या जागेसाठी ३० वर्षांची परवानगी शासनाकडून मिळवून देण्याचे आश्वासन दिले. या वेळी व्यासपीठावर डॉ सनाउल्लाह घरटकर, पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने, डॉ. रागिणी पारेख, अलि शश्मी, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, संजीवनीचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे, शाहीद हसन कलाब, अतिक खतीब, डॉ. मकबुल कोकाटे, घरटकर फाउंडेशनचे अध्यक्ष राशीद फहीम, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, इम्तिहाज पारकर, कमाल मांडलेकर, डॉ. मुब्शीर जमादार, अहसान सय्यद, प्रा. मेघराज जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

पदमश्री डॉ. लहाने मार्गदर्शन करताना म्हणाले की, डॉ. घरटकर यांच्या दातृत्वाची तमाम मुरुडकर व कोकणातील जनतेला जाती धर्मा पलिकडे जाऊन सदैव मदतीचा हात पुढे केला असुन शैक्षणिक क्षेत्रात देखिल महत्वाचे योगदान दिले आहे. संजीवनी संस्थेतर्फे मुरुडरत्न म्हणून त्यांचा गौरव करताना विशेष आनंद असल्याचे सांगितले.

आगामी काळात मुरुडमध्ये दर महिन्यात एक नेत्रचिकित्सा केंद्र व ह्रदरोग चिकित्सा केंद्र सुरु करणार असल्याचे घोषित केले. या वेळी विजय सुर्वे, मंगेश दांडेकर, वैशाली बोबडे, अहसान सय्यद, प्रा.जाधव यांची भाषणे झाली.

समारोपावेळी डॉ. घरटकर यांनी विद्यार्थी व पालकांना उद्देशून सांगितले की, कोकणातदेखील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक पात्रता आहे ती ओळखून विद्यार्थ्यांना तज्ञांचे व्यवसाय मार्गदर्शन शिबीरे आम्ही घेत असतो त्याचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करत मुरुड ची सर्वांगीण प्रगती हा एकच ध्यास असल्याचे स्पष्ट करीत युवा पिढीने सामर्थ्यवान बनावे असे आवाहन केले .

प्रास्ताविक राशीद फहीम यांनी केले व आभार डॉ. मकबुल कोकाटे यांनी तर सूत्रसंचालन शाहिद कलाब व वासंती उमरोटकर यांनी केले.

# कबड्डी स्पर्धेत शिवाई बांधण संघ विजेता

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथील कब्बडी स्पर्धेत शिवाई बांधण संघाने प्रथम क्रमाकांचे विजेते ठरले तर जय भवानी, वाशी संघाला उपविजेते पटकाविले, तृतीय क्रमांक नुतन हनुमार, ढवर व चतुर्थ क्रमांक जय हनुमान वायशेत हे संघ मानकरी ठरले. या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू-राज जंगम, शिवाई बांधण, उत्कृष्ट चढाई-विनित म्हात्रे, वायशेत, उत्कृष्ट पकड-कौस्तुभ पाटील, वाशी, पब्लीक हिरो-सिध्देश पाटील, ढवर यांची निवड करण्यात आली.



अलिबाग तालुक्यातील प्रसिध्द देवस्थान श्री स्वामी दत्तनाथ चैतन्यधाम, रसाणी टेकडी कुरूड, वेश्वी, वाडगांव, व वेलकडे आयोजीत श्री दत्त यात्रौत्सवाचे निमित्ताने रविवार ७ डिसेंबर रोजी जयेंद्र भगत पुरस्कृत व वाडगाव ग्रामस्थ मंडळ यांचे वतीने आयोजीत कब्बडी स्पर्धेचा दुपारी ठिक तिन वाजता जल्लोषात प्रारंभ झाला. या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी आमदार महेंद्र दळवी व ॲड.आस्वाद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.स्वर्गिय काशिनाथ जनार्दन भगत व स्वर्गिय बाळू शांताराम थळे यांच्या स्मृती चषक कब्बडी स्पर्धेत एकूण १६ पुरूष निमंत्रीत संघ खेळविण्यात आले.

या वेळी आमदार महेंद्र दळवी, ॲड. आस्वाद पाटील यांचे समवेत वाडगाव ग्रा.प.सरपंच सारिका पवार, माजी सरपंच सरिता भगत, ग्रा.प.सदस्या निलम थळे, रूपाली पाटील, तसेच चारूहास मगर, संजय पाटील, वेश्वी सरपंच गणेश गावडे, हर्षल पाटील आदी मान्यवराची उपस्थिती होती. या वेळी उपस्थित प्रमुख मान्यवर आमदार महेंद्र दळवी व ॲड. आस्वाद पाटील यांचे स्वागत श्री दत्त जयंती उत्सव कार्याध्यवर्गिय काशिनाथ जनार्दन भगत व स्वर्गिय बाळू शांताराम थळे यांच्या स्मृती चषक कब्बडी स्पर्धेत एकूण १६ पुरूष निमंत्रीत संघ खेळविण्यात येत आहेत. या स्पर्धेचा शुभारंभ आमदार महेंद्र दळवी यांचे प्रमुख उपस्थितीत ॲड. आस्वाद पाटील यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.

या स्पर्धेचा बक्षिस वितरण कार्यक्रम ॲड. प्रसाद पाटील, सुजाता पाटील, जयेंद्र भगत, प्रसाद पाटील, नरेश थळे, चंद्रकांत ठाकूर, नथुराम म्हात्रे, गणपत पवार, सिताराम भगत, सरिता भगत, सरपंच सारिका पवार यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. स्पर्धेत प्रथम क्रमांकास भव्य चषक व रोख १५ हजार रूपये, व्दितीय क्रमांकास भव्य चषक व रोख १० हजार रूपये, तृतीय क्रमांकास भव्य चषक व रोख ५ हजार रूपये, चतुर्थ क्रमांकास भव्य चषक व रोख ५ हजार रूपये तसेच उत्कृष्ट पकड, उत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ट चढाई व पब्लीक हिरो यांना भव्य चषक प्रदान करण्यात आले.

या कब्बडी स्पर्धेचे निरिक्षक म्हणून जनार्दन पाटील तसेच अनिल राउत, अविनाश गोंधळी, अच्युत पाटील, बाळाराम थळे, तुषार पाटील, चेतन पाटील हे पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी पुरस्कर्ते जयेंद्र भगत व वाडगाव ग्रामस्थ व युवा वर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळप्रकरणी आरोपी अटकेत

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील दुर्गम ग्रामिण भागांतील अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी म्हसळा पोलिसांनी पोक्सो कायद्याप्रमाणे गुन्हा नोंदविला आहे. आरोपीला वैभव महादेव काते (वय २०, रा.वावडुंगी, मुरूड, रायगड) याला मुरुड येथून अटक केली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे, म्हसळा पोलीस स्टेशनचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी घटना स्थळी तात्काळ भेट दिल्याचे तपासिक अधिकारी ज्ञानेश्वर एडवळे यानी सांगितले.

म्हसळा पोलिसांनी काही तासाचे अवधीतच नराधमाला अटक केल्याने म्हसळा पोलीसांचे कौतुक होत आहे. ग्रामिण भागातील आणि एसएससीपर्यंत शिक्षण घेतलेल्या गरीब कुटुंबातील फिर्यादी मुलीने सोशल मिडीयाचे माध्यमातून इन्टाग्रामच्या वापरातून याअनोळखी युवका जवळील मैत्रीमुळे ती लैंगिक अत्याचारांत फसल्याचे समजते.

# आदिवासी बांधवांना ब्लँकेटचे मोफत वाटप




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारतीबेन रमणीकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत सहा आदिवासी वाड्यांवर ब्लॅकेटचे मोफत वाटप करण्यात आले.

या वेळी दुधनी, खेमवाडी, घोडगाव, भाग्याची वाडी, ताडगाव आदी वाड्यांवरील एक हजार उबदार ब्लॅकेटचे वाटप भारतीबेन रमणीकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने ट्रस्टी शैलेश शहा,रंजना शहा यांनी केले. या वेळी राकेश चव्हाण, प्रतिमा ललान,दत्तगुरु सामाजिक मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते. डोंगर माथ्यावर राहणाऱ्या आदीवासी बांधवांना ऐन थंडीत मोफत उबदार ब्लॅकेट मिळाल्याने त्यांनी भारतीबेन रमणिकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्टचे आभार मानले.

# बहुजन विद्यार्थी संघटनेकडून चैत्यभूमीवर अन्नदान



**पाली : प्रतिनिधी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवर देशभरातून लाखो-भीमानुयायी ४ डिसेंबर पासूनच दादर येथील शिवाजी पार्क परिसरात येत असतात. त्यांची उपासमार होऊ नये म्हणून बहुजन विद्यार्थी संघटनेच्या वतीने ६ डिसेंबर रोजी अन्नदान करण्यात आले.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आणि देशाच्या विविध राज्यांतून लाखोंच्या संख्येने बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी भीम अनुयायी चैत्यभूमीवर येत असतात. अलोट गर्दीचा उच्चांक दर वर्षी मोडला जात आहे. दादर आणि शिवाजी पार्क परिसरात हॉटेल बंद ठेवली जातात साधा चहा सुद्धा मिळत नाही त्यामुळे आलेल्या धन सैनिकांची उपासमार होऊ नये यासाठी बहुजन विद्यार्थी संघटनेच्या भिवंडी शहराच्या वतीने १९९८ पासून सलग चैत्यभूमी वर अन्नदान केले जाते. अन्नदान करण्यासाठी भिवंडी शहरातील बी एन एन महाविद्यालयाचे सहकार्य नेहमीच संघटनेला राहिले आहे. अनेकांच्या सहकार्यामुळे चैत्यभूमी वर आलेल्या भीम अनुयायांना बहुजन विद्यार्थी संघटनेच्या वतीने अन्नदान वाटप केले जाते.

बहुजन विद्यार्थी संघटनेचे भिवंडी शहर सरचिटणीस सचिन गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे पदाधिकारी ॲड. निखिल उबाळे, ॲड. आप्पाराव मस्के, फय्याज मोमीन, नंदन अहिरे, योगेश इंदुलकर, अद्वैत वाणी, सम्यक वाणी महिला आघाडी निलमताई धावारे, निशा भोईर, सना मोमीन, वंदना सावकारे, राणी, जाधव, फिझा मन्सूर आलमास मोमिन यांनी अन्नदान वाटण्यास मोलाचे योगदान दिले.

# महेंद्र पवार यांचा सेवानिवृत्त संघटनेतर्फे सत्कार

**नागोठणे : बातमीदार**

सेवानिवृत्त संघटना नागोठणे विभागाची सभा श्री जोगेश्वरी मंदिर समोरील राजन उपाध्ये यांच्या प्रांगणात खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या मासिक सभेचे औचित्य साधून नव्यानेच संघटनेचे सदस्य म्हणून कार्यरत झालेले नुकतेच शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले आरोग्य सेवक महेंद्र पवार यांचा संघटनेच्या वतीने श्रीफळ गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.



संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा विनिमय झाल्यानंतर सभेची सांगता करण्यात आली. या सभेचे आभार प्रदर्शन संघटनेचे सल्लागार जयराम पवार यांनी केले.


या सभेला अध्यक्ष दत्तात्रेय झोलगे, जिल्हा संघटनेचे सल्लागार एस.एन.गायकवाड, सचिव विकास जाधव, जयराम पवार, नरेंद्र सोष्टे, स्नेहल सोष्टे, विमल शिंदे, भास्कर सोलेगावकर, भोगे सर, भिकू शहापूरकर, सुभाष भोय,शकंर चव्हाण, दिगंबर खराडे, भाऊ आमडोसकर, मधुकर साळुंखे, दिगंबर चौधरी आदी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# श्रीवर्धनमध्ये भक्तीचा महासंगम : सोमजादेवी रथोत्सवासाठी भाविकांची गर्दी

**श्रीवर्धन : भारत चोगले**

श्रीवर्धन तालुक्याची ग्रामदेवता, ‘हाकेला धावणारी नवसाला पावणारी’ अशी ख्याती असलेली श्री सोमजाई देवी यांचा वार्षिक रथोत्सव ५ डिसेंबर ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत दिमाखात साजरा होत आहे. संपूर्ण श्रीवर्धन भक्तिभावाने उजळून निघाले असून कोकणासह महाराष्ट्रभरातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी दाखल होत आहेत.

श्री सोमजादेवी देवस्थान, ज्याला ‘दक्षिण काशी’ म्हणून ख्याती आहे, याची स्थापना श्री अगस्ती महामुनींनी केली आहे. देवस्थानाच्या चारही दिशांना चार शिवशक्तींचे सामर्थ्य नांदते कंकाळी, भद्रकाली, कात्यायनी, चामुंडायनीमुख्य देवता श्री सोमजाई देवी, शाळिग्राम रूपात प्रकट असून शिव-भवानी, नंदी आणि वासुकी या तीन शक्तींचे सामर्थ्य देवीमध्ये एकत्र प्रकट झाले आहे. देवीच्या चरणी जहाल सापाचे विष उतरते, भुत-पिशाच्च बाधा दूर होते आणि भाविकांच्या अनंत मनोकामना पूर्ण होतात, अशी दृढ लोकश्रद्धा आहे. ॐ वासुकेय नमः या मंत्राचा उच्चार देवस्थान परिसरात सतत घुमत असतो.



कोणत्याही प्राणीमात्रास सर्पदंश किंवा विषबाधा झाल्यास, कोणताही उपचार न करता सर्वप्रथम श्री सोमजाई मातेच्या मंदिरात आणावे. मंदिरात आणण्यापूर्वी जर काही प्राथमिक उपचार केले असतील तर त्याची संपूर्ण माहिती पुजाऱ्याला द्यावी. देवीच्या कृपेने अनेकांना नवजीवन मिळाल्याची उदाहरणे वर्षानुवर्षे भक्त सांगत आले आहेत.

५ डिसेंबर २०२५ रथोत्सव सप्ताहाचा मंगल प्रारंभ सकाळी ८.०० वाजता झाले असून १२ डिसेंबर २०२५ पहाटे ५.३० वा. काकड आरती, ११.३० ते ३.३० महाप्रसाद, मध्यरात्री १२.०० - स्थयान पूजाविधी १३ डिसेंबर २०२५ दुपारी १२ नंतर रथयात्रेची भव्य सांगता ढोल-ताशे, शंखध्वनी, भजन-कीर्तन आणि देवीचे गजर यामुळे संपूर्ण श्रीवर्धन भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही कोकण, मुंबई-पुणे उपनगर, सातारा-कोल्हापूर, विदर्भ-मराठवाडा या सर्व भागांतून हजारो भक्त देवीच्या रथोत्सवात दर्शनासाठी येत आहेत. मनोकामना पूर्ण करणारी जागृत देवी अशी मातोश्रींची कीर्ती असल्यामुळे, नवस फेडण्यासाठी भाविकांचे ओघ अखंड सुरू आहे.

देवस्थानात येणाऱ्या प्रत्येक भक्तावर देवीची कृपा असल्याची भावना सर्वत्र दिसते. नवरसपूर्ण रथयात्रा आणि भक्तिमय भजनांनी श्रीवर्धनचे वातावरण अध्यात्मिक दिव्यतेने भारून गेले आहे.

